


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५


दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०२७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




## थोडक्यात...

### न्यासांचे पैसे भांडवली बाजारात

नागपूर (समर्थ गांवकरी) : राज्य सरकारने महाराष्ट्र सार्वजनिक न्यास कायदा दुरुस्तीचे विधेयक विधानसभेत सादर केले. या विधेयकानुसार, महत्त्वाच्या देवस्थानांसह सार्वजनिक न्यासांना त्यांच्या एकूण निधीच्या कमाल 50 टक्क्यांपर्यंत रक्कम समभाग संलग्न निवडक साधनांमध्ये गुंतवण्याची परवानगी देण्यात आली आहे. न्यासांचे प्रशासन अधिक प्रमाणित करणे, न्यायालयीन वाद कमी करणे तसेच न्यास मंडळातील सदस्यांवर नियमित देखरेख आणि जबाबदारी निश्चित करणे हा या दुरुस्तीचा उद्देश आहे. विधेयकात म्हटले आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक न्यास कायदा तयार करण्यात आला तेव्हा विविध ट्रस्ट दस्तांच्या तरतुदींमध्ये कार्यकाळ किंवा नियुक्तीची स्पष्टता नसल्याने अनेक वाद न्यायालयात आणि चॅरिटी कमिशनरसमोर निर्माण होत होते. नवीन तरतुदीनुसार, एखाद्या न्यासातील आजीवन विश्वस्तांची संख्या एकूण विश्वस्त मंडळाच्या 25 टक्क्यांपेक्षा जास्त असू शकणार नाही. तसेच, जर ट्रस्ट दस्तावेजात कार्यकाळ नमूद नसेल, तर त्या विश्वस्तास कमाल पाच वर्षांचा कार्यकाळ देऊन विश्वस्त म्हणून नियुक्त केले जाईल.

# पार्थ पवार यांना वाचवताय का?

## पुणे जमीन प्रकरणात उच्च न्यायालयाचा सरकारला सवाल

मुंबई : (समर्थ गांवकरी)



पुणेस्थित भूखंड खरेदीप्रकरणी दाखल गुन्ह्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या नावाचा समावेश नसल्यावर उच्च न्यायालयाने बुधवारी बोट ठेवले. तसेच, पार्थ यांच्या नावाचा उल्लेख न करून पुणे पोलीस त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला.


प्राथमिक माहिती अहवालात (एफआयआर) पार्थ याचे नाव नसल्याकडे लक्ष वेधताना पोलीस या प्रकरणी उपमुख्यमंत्र्यांच्या पुत्राचे संरक्षण करत आहेत का आणि फक्त इतरांची चौकशी करत आहेत का? अशी टिप्पणीही न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठाने केली. त्यावर पोलीस या प्रकरणाची चौकशी करत आहेत आणि कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे सरकारी वकील मानकुंवर देशमुख यांनी न्यायालयाला आश्वासित केले.

बावधन पोलीस ठाण्यात नोव्हेंबरमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्याप्रकरणी व्यावसायिक शीतल तेजवानीच्या अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने उपरोक्त टिप्पणी केली. तत्पूर्वी, अमाडिया एंटरप्रायझेस एलएलपी या फर्ममध्ये पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील भागीदार आहेत, त्यांनी पुण्यातील प्रमुख मुंढवा भागात ४० एकर जमीन खरेदी केली, ही जमीन महार वतन जमीन म्हणून वर्गीकृत होती. हा त्याच जमिनीच्या व्यवहारातील दुसरा गुन्हा आहे आणि पुणे पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखादेखील या प्रकरणाची चौकशी करत आहे, असे तेजवानीचे वकील राजीव चव्हाण आणि वकील अजय भिसे यांनी न्यायालयाला सांगितले.

फसवणूक आणि गुन्हेगारी विश्वासघाताच्या आरोपांतर्गत दिग्विजय पाटील, तेजवानी आणि निबंधक कार्यालयाचे निलंबित उपनिबंधक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील हे भागीदार असलेल्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी या फर्मने पुण्यातील प्राइम मुंढवा भागात ४० एकर जमीन खरेदी केली. ती महार वतन जमीन म्हणून वर्गीकृत होती. नियमांनुसार, अशा वतन जमिनी राज्य सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय विकता येत नाहीत. जमिनीचे प्रत्यक्ष बाजार मूल्य या रकमेच्या पाचपटपेक्षा जास्त असताना ती कंपनीला केवळ ३०० कोटी रुपयांना विकण्यात आली आणि मुद्रांक शुल्कात सूट देण्यात आली, असा आरोप आहे.

# चीनचे व्यापार आधिक्य एक ट्रिलियन डॉलर

हाँगकाँग : (समर्थ गांवकरी)



आर्थिक असंतुलन दूर करण्याचे 'आयएमएफ'चे आवाहन

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन आणि अन्य अनेक देशांमधून आयातीवर कर वाढवल्यानंतर चीनची जागतिक निर्यात वाढत आहे, तर अमेरिकेला होणारी निर्यात कमी झाली असतानाच चीनने २०२५ साठीचा त्यांचे व्यापार आधिक्य १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचले असल्याचा अहवाल जारी केला आहे. दरम्यान, १.४ अब्ज लोकसंख्येचा हा देश केवळ निर्यातीवर अवलंबून राहण्याइतका मोठा आहे, असे सांगून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुखांनी चीनला आर्थिक असंतुलन दुरुस्त करण्याचे आवाहन केले आहे. चीनमधील देशांतर्गत मागणी कमी झाल्यामुळे डॉलर आणि इतर चलनांच्या तुलनेत युआन कमकुवत झाला आहे. यामुळे चीनची निर्यात इतर देशांच्या तुलनेत स्वस्त झाली आहे, ज्यामुळे व्यापार असमतोल आणखी वाढला आहे. आयएमएफच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्टलिना जॉर्जिएवा म्हणाल्या की निर्यातीवर जास्त अवलंबून राहिल्याने त्यांचे व्यापारी भागीदार चीनमधून आयात कमी करण्यासाठी पुढील पावले उचलू शकतात. निर्यातीवर आधारित वाढीवर (चीन) अवलंबून राहिल्याने जागतिक व्यापार तणाव आणखी वाढू शकतो, असे त्यांनी बुधवारी पत्रपरिषदेत सांगितले. चीन आता वाढीचा स्रोत म्हणून केवळ निर्यातीवर अवलंबून राहण्याइतका मोठा आहे. आणि (त्यांच्याकडे) एक मोठी देशांतर्गत बाजारपेठ आहे जी येत्या काही वर्षांत वाढीचा प्रमुख स्रोत असू शकते, असे त्या म्हणाल्या. पुढील पाच वर्षांच्या योजनांची रूपरेषा आखण्यासाठी ऑक्टोबरमध्ये झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत, चीनच्या नेत्यांनी देशांतर्गत वापर वाढवण्याच्या गरजेवर भर दिला.

# भारत-अमेरिकेदरम्यान व्यापार करारावर चर्चा सुरू

नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)



भारत-अमेरिकेदरम्यानच्या प्रस्तावित व्यापार करारावर चर्चा करण्यासाठी उभय देशांच्या शिष्टमंडळाची दोन दिवसीय बैठक बुधवारपासून सुरू झाली. पहिल्या दिवशी भारताचे वाणिज्य सचिव राजेश अगरवाल यांनी अमेरिकेचे व्यापार विभागाचे उच्चाधिकारी रीक स्वित्झर यांची भेट घेतली. यावेळी कराराबाबत आतापर्यंत झालेल्या चर्चेतील मुद्द्यांचा आढावा घेण्यात आला. या कराराचा दोन्ही देशांना कसा फायदा होईल आणि परस्परांमध्ये आर्थिक संबंध कसे वृद्धिंगत होतील, यावर या चर्चेत भर देण्यात येणार आहे, अशी माहिती वाणिज्य मंत्रालयाने समाजमाध्यमावर दिली आहे.

उभय देशांनी फेब्रुवारीपासून या प्रस्तावित करारावर चर्चेला सुरुवात केली असून चर्चेचा पहिला टप्पा डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत यासंदर्भात दोन्ही देशांतील शिष्टमंडळांच्या सहा बैठका पार पडल्या आहेत. अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाने भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयातशुल्क लावल्याने भारतीय निर्यातदारांना मोठा फटका बसला आहे. अमेरिकन बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात येणाऱ्या भारतीय तांदळावरही आयातशुल्क वाढवण्याचा इशारा अमेरिकेने नुकताच दिला आहे. अमेरिकेने सुरुवातीला भारतीय वस्तूंवर २५ टक्के आयातशुल्क लावले आणि त्यानंतर युक्रेनविरोधात युद्ध पुकारणाऱ्या रशियाकडून कच्च्या तेलाची आयात केल्याप्रकरणी त्यात आणखी २५ टक्क्यांची भर घातली.

# पालिकांमधील उमेदवारांच्या निवडणूक खर्चात वाढ

मुंबई : (समर्थ गांवकरी)



राज्यातील २४ नगरपालिका, नगरपंचायती आणि १५४ सदस्यांच्या निवडणूका न्यायप्रविष्ठ प्रकरणांमुळे लांबणीवर पडल्या आहेत, तेथील उमेदवारांना पुन्हा निवडणूक प्रचारासाठीच्या खर्चात ६० टक्के पर्यंत वाढीव खर्चाची अनुमती देण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोग लवकरच घेणार असल्याची माहिती आयोगातील सूत्रांनी दिली.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबरला राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतीसाठी २ डिसेंबरला मतदान घेण्याची घोषणा निवडणूक आयोगाने केली होती. मात्र काही नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील दाखल झालेल्या म्हणजेच न्यायप्रविष्ठ २४ नगरपालिका, नगरपंचायतीच्या अध्यक्षपदांच्या आणि विविध ठिकाणच्या १५४ सदस्यपदाच्या जागांवरील निवडणुका स्थगित करीत या निवडणुका २० डिसेंबरला घेण्याची घोषणा आयोगाने केली होती.

ज्या नगरपालिकांची निवडणूक येत्या २० डिसेंबरला होणार त्या जिल्हानिहाय नगरपालिका पुढीलप्रमाणे- ठाणे- अंबरनाथ. अहिल्यानगर- कोपरगाव, देवळालीप्रवरा, पाथर्डी व नेवासा. पुणे- बारामती व फुरसुंगी- उरुळी देवाची. सोलापूर- अनगर व मंगळवेढा. सातारा- महाबळेश्वर व फलटण. छत्रपती संभाजीनगर- फुलंब्री. नांदेड- मुखेड व धर्माबाद. लातूर- निलंगा व रेणापूर. हिंगोली- बसमत. अमरावती- अनंजनगाव सूर्जी. अकोला- बाळापूर. यवतमाळ- यवतमाळ. वाशीम- वाशीम. बुलढाणा- देऊळगावराजा. वर्धा- देवळी. चंद्रपूर- घुग्घूस या नगरपालिकांचा समावेश आहे.

निवडणुका पुढे गेल्यामुळे यापूर्वी केलेला प्रचार आणि त्यावर झालेला खर्च वाया गेला असून नव्याने प्रचारासाठी निधी खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे निवडणूक खर्चाची मर्यादा वाढविण्याची मागणी राजकीय पक्ष तसेच उमेदवारांनी निवडणूक आयोगाकडे केली होती.

यंदाच्या निवडणुकीसाठी नगरपालिका, नगरपंचायतींसाठी निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चाची मर्यादा वाढवून दिली आहे. त्यानुसार अ वर्ग नगरपालिकांच्या नगराध्यक्षासाठी १५ लाख तर सदस्यांसाठी ५ लाख, ब वर्ग नगरपालिकामध्ये नगराध्यक्षासाठी ११लाख २५ हजार तर सदस्यासाठी ३ लाख ५० हजार, क वर्ग नगरपालिकेत नगराध्यक्षासाठी ७ लाख ५० हजार तर सदस्यासाठी २ लाख ५० हजार तर नगरपंचायतीमध्ये थेट नगराध्यक्षासाठी ६ लाख आणि सदस्यांसाठी २ लाख २५ हजार रुपयांची खर्च मर्यादा ठरवून देण्यात आली आहे. मात्र २४ नगरपालिका आणि १५४ सदस्यांच्या निवडणुका १९ दिवस पुढे गेल्याने पुन्हा प्रचार करण्यासाठी तेथील उमेदवांच्या निवडणूक खर्चात ६० टक्के वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे या उमेदवारांना वाढीव खर्च करता येईल मात्र तो आयोगाने ठरवून दिलेल्या मर्यादेतच करावा लागेल असेही आयोगातील सूत्रांनी सांगितले.

# भंडारदरा धरण शतकी : प्रवरा घाटीतल्या जलक्रांतीचा अविस्मरणीय प्रवास

## भिंतीचे बांधकाम २०० फूट झाल्यानंतर धरणातून सोडण्यात आले पाणी

अकोले : (समर्थ गांवकरी)

ज्या धरणातील पाण्याने अहील्यानगर जिल्ह्याच्या दुष्काळी भागाचा कायापालट केला,सततच्या अवर्षणामुळे पाण्यासाठी आसुसलेल्या उजाड ओसाड शेतजमिनीत हिरवेगार मळे फुलविले, सहकारी साखर कारखानदारीची मुहूर्तमेढ रोवली,कृषी आउद्योगिक क्रांतीला बळकटी दिली,लाभ क्षेत्रात समृद्धीची बेटे फुलविली ते भंडारदरा आज १० डिसेंबर रोजी शंभरात प्रवेश करीत आहे.वयाच्या शंभरित धरण काहीसे थकले असेले तरी त्यामधील अमृतवाहिनी प्रवरा नादिचे पाणी आजही हजारो एकर शेतीची अन लाखो भूमिपुत्रांची तहान भागवत त्यांची उमेद जागवत आहे. सरकार दरबारी विल्सन डॅम अशी नोंद असलेल्या या धरणाचे अलीकडेच' आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे जलाशय' असे नामकरण करण्यात आले आहे. काळया पाषाणातील या ब्रिटिशकालीन धरणाच्या निर्मितीची कथा रोमांचक अशीच आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या दुष्काळी भागाला पाणीपुरवठा करण्याचे प्रयत्न तत्कालीन ब्रिटिश सरकारने एकोणीस व्या शतकाच्या उत्तरार्धातच सुरू केले होते.संगमनेर तालुक्यातील ओझर येथे १८९३ मध्ये प्रवरा नदीवर बंधारा बांधून त्याच्या डाव्या आणि उजव्या कालव्याद्वारे शेतीला पाणी पुरवले जात असे.

अधिक क्षेत्राला तसेच उन्हाळ्यातही पाणीपुरवठा करता यावा यासाठी प्रवरा नदीवर ओझर बंधाऱ्याच्या वरील भागात म्हाळादेवी येथे साठवण तलाव म्हणून मातीचे धरण बांधण्यास १८८२ मध्ये सुरवात झाली होती. मात्र पुढे तांत्रिक कारणामुळे मातीचे धरण बांधण्याचा निर्णय रद्द करण्यात आला आणि दगडी धरण बांधण्याचे ठरविण्यात आले. तत्कालीन ब्रिटिश अभियंत्यानी स्थानिकांच्या मदतीने प्रवरा नदीवर नवीनजागेचा शोध घेण्यास सुरुवात केली. साम्रद, रंधा, उंचखडक, धादरफळ, मंगळापुर आदी पर्यायांचा विचार केल्यानंतर भंडारदरा गावाजवळील ईश्वरदा टेकडी जवळील जागा धरण बांधकामासाठी निश्चित करण्यात आली. या टेकडी जवळ प्रवरा नदी खोल पण अरुंद दरीतून वाहते. त्यामुळे धरणासाठी ही योग्य जागा होती. ऑगस्ट १९०७ मध्ये या ठिकाणी धरण बांधण्याच्या प्रस्तावात मंजुरी मिळाली.

प्रकल्पास मान्यता मिळाल्यानंतर अधिकाऱ्यांनी बांधकामाच्या दृष्टीने पूर्वतयारी सुरू केली.बांधकामाचा सविस्तर आराखडा तयार करण्यात आला. बांधकामासाठी भंडारदरा येथे स्वतंत्र उपविभागाची निर्मिती करण्यात आली.प्रस्तावित भिंतीच्या दोन्ही बाजूला इन्स्पेक्शन बंगले बांधण्यात आले.भंडारदऱ्यापासून जवळचे रेल्वे स्थानक घोटी होते. तेथून यंत्रसामग्री आणि इतर सामान भंडादऱ्याला आणण्यात येणार होते. त्यासाठी घोटी कोल्हार मार्गापासून पेंडशेत चिचोंडी ते भंडारदरा असा चार मैल लांबीचा नवीन रस्ता तयार करण्यात आला. रंधा घाटघर रस्त्याची ही दुरुस्ती करण्यात आली.एक भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्यात आला.

भंडारा धरणाची भिंत दगड आणि चुन्यात बांधण्यात आली आहे. दगड खाणीसाठी परिसरातील जागा निश्चित करण्यात आल्या. तेथून दगड वाहतुकीसाठी "ट्रामलाईन" टाकण्यात आली. तसेच गाढवावरून आणि बैलगाडीनेही दगडाची वाहतूक केली जात होती. धरणात अंशतः पाणी साठू लागल्यानंतर होडीने बांधकाम स्थळावर दगड आणले जात.

वासाळी आणि कातळापूर येथे 'लाईम डेपो' तयार करण्यात आले. लासलगाव ते घोटी दरम्यान विविध ठिकाणाहून रेल्वेने चुनखडीची वाहतूक घोटी पर्यंत केली जात असे .भंडारदरा धरणाच्या बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा (क्रश संड )वापर करण्यात आला आहे. ही कृत्रिम वाळू तयार करण्यासाठी धरण परिसरात ठिकठिकाणी आवश्यक त्या यंत्रसामुग्रीची उभारणी करण्यात आली.



कर्मचारी कामगारांसाठी परिसरात घरे बांधण्यात आली. दवाखान्याची सोय करण्यात आली पोस्ट ऑफिस सुरू करण्यात आले.स्वतंत्र टेलिफोन लाईन टाकण्यात आली.अन्य आवश्यक सोयी सुविधा निर्माण करण्यात आल्या

प्रत्यक्ष धरण बांधकामास १९१० मध्ये सुरुवात करण्यात आली. भडारदऱ्याचा हा शांत रमणीय परिसर यंत्रांचा खडखडात आणि अधिकारी, कर्मचारी, मजूर यांची वर्दळ या मुळे गजबजून गेला. झपाट्याने धरण बांधकाम सुरू झाले .दगडावर दगड रचले जाऊ लागले.पहिल्या तीन वर्षातच भिंतिचे ७५ फूट उंच बांधकाम झाले होते.१९२०-२१ मध्ये भिंतीचे बांधकाम २०० फूट उंचीपर्यंत पोहचले होते.त्याच वर्षात नोव्हेंबर १९२० मध्ये धरणातून प्रथमच सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले.

बांधकाम काळात काही कसोटीचे क्षणही आले. ऑगस्ट १९१६ मध्ये धरण परिसरात प्लेग चा प्रादुर्भाव झाला. तातडीने आरोग्य विभागाची संपर्क साधून प्लेग साठी स्वतंत्र डॉक्टरची तसेच प्लेग इन्स्पेक्टरची नेमणूक करण्यात आली.त्यांनी आवश्यक त्या उपाययोजना केल्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही १९१८-१९ या वर्षात जिल्ह्या प्रमाणे अकोले तालुक्यातही मोठा दुष्काळ पडला होता. या कसोटीच्या काळात भंडारदरा धरणाने सुमारे आठ हजार लोकांना रोजगार उपलब्ध करून देत मोठा आधार दिला. या लोकांना स्वस्त दरात अन्नधान्य उपलब्ध करून दिले गेले. त्यामुळे तालुक्यात कोणत्याही स्वरूपाचे दुष्काळी काम सुरू करावे लागले नाही. बांधकाम सुरू असताना लहान मोठे अपघात होत. धरणावर सुरू करण्यात आलेल्या दवाखान्यात एका सर्जनची व अन्य आवश्यक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. या ठिकाणी बांधकाम काळात जेव्हा जेव्हा काही अपघात झाले त्यावेळेला अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

मूळ प्रस्तावानुसार २५० फूट उंचीचे धरण बांधून त्यात २४० फुटापर्यंत पाणी साठवण्याचे नियोजन होते. पण पुढे आधी २६० फूट आणि नंतर २७० फूट उंचीपर्यंत धरण बांधकाम करावयाचे व त्यात २६० फूट उंचीपर्यंत पाणी साठवायचे असे निश्चित करण्यात आला. त्यामुळे धरणाच्या सांडव्याची जागा ही दोन वेळा बदलण्यात आली. बांधले तेव्हा भंडारदरा हे देशातील सर्वात उंच धरण होते.

१९१० मध्ये सुरू झालेल्या या धरणाचे बांधकाम १९२६, मध्ये पूर्ण झाले. दरवर्षी सात ते आठ महिने बांधकाम सुरू असे. दहा डिसेंबर १९२६ रोजी तत्कालीन मुंबई प्रांताचे गव्हर्नर लेस्ली विल्सन यांच्या हस्ते धरणाचे लोकार्पण करण्यात आले.

या घटनेला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. लोकार्पण झाले त्यावेळेला घराण्याची साठव क्षमता दहा हजार ८६ दशलक्ष घनफूट होती. पुढे १९४०-४१ मध्ये धरणाच्या सांडव्यावर पाच साडेपाच फूट उंचीची भिंत बांधण्यात आली. त्यामुळे आता धरणात २६५.७० फूट उंचीपर्यंत पाणी साठवण्यात येते. धरणाची क्षमता अकरा हजार ३९ दशलक्ष घनफूट झाली आहे.

भंडारदरा धरणाचा शतक महोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने या जलाशयाच्या संवर्धनासाठी व या भागातील निसर्ग पर्यटनाच्या संधी निर्माण करून देण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शताब्दी महोत्सव समिती स्थापन करण्यात आली.

# पॅकेज टूर अंतर्गत पर्यटनासाठी लालपरी सज्ज

## कंधार आगारातून नियोजन : गड किल्ले, धार्मिक दर्शनाची प्रवाशांना सुविधा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

पर्यटन व धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी प्रवाशांच्या मागणीनुसार ४४ प्रवासी थेट उपलब्ध असल्यास कंधार आगारातून ज्यादा बसेस सोडण्यात येणार आहेत. राज्य परिवहन महामंडळच्या नांदेड विभागातून पर्यटन बस सेवेचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रवासी समूहाला एकत्रित प्रवास करून महाराष्ट्रातील विविध मंदिर, धार्मिक क्षेत्र, गड किल्ले आदी ठिकाणी भेट देऊन रापमच्या सेवेचा अल्प दरात लाभ घेता येणार आहे. कंधार आगारातून पर्यटन व धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. ४४ प्रवासी थेट उपलब्ध असतील तर ज्यादा



बसेस सोडण्यात येणार आहेत. तसेच दशमी एकादशी, द्वादशीला कंधार आगारातून पंढरपूर येथे जाण्यासाठी जादा बसेस सोडण्याचेही नियोजन केले आहे. राज्य परिवहन महामंडळातर्फे सुरू केलेल्या पर्यटन बसचा प्रवाशांनी यापूर्वी महाराष्ट्रातील अनेक देवदर्शन व इतर ठिकाणी लाभ घेतला आहे. ही बस सेवा अत्यंत चांगली व पर्यटनांचा आनंद देणारी असून अत्यल्प दराची आहे. आपण स्वतः या क्षणाचे साक्षीदार होऊन पंढरपूर, कोल्हापूरसह विविध परिसरातील स्थळांना भेटी देण्यासाठी कंधार व लोहा महिलांनी व इतर पर्यटकांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन प्रभारी आगार व्यवस्थापक अनिल पळनाटे यांनी केले आहे .

पंढरपूर, पन्हाळा, जोतिबा, कोल्हापूर, गणपतीपुळे दर्शन व परत परळी वैजनाथ औंढा नागनाथ, वेरूळ, घृष्णेश्वर, त्र्यंबकेश्वर (भीमाशंकर पाच ज्योतिर्लिंग) साडेतीन शक्तीपीठ माहूर, सप्तशृंगी गड, कोल्हापूर, तुळजापूर परत अष्टविनायक दर्शन, महाबळेश्वर, पाचगणी दर्शन, तुळजापूर, अक्कलकोट, नरसोबाची वाडी, पंढरपूर दर्शन व परत शनिशिंगणापूर, शिर्डी दर्शन परत कोल्हापूर, जेजुरी दर्शन परत वेरूळ, अजंठा लेणी, राजुर गणपती दर्शन परत देऊळगाव राजा लोणार सरोवर, शेगाव दर्शन परत.

### लग्नसराई ओसरली

दिवाळी सुट्टी हंगामानंतर लग्नसराईमुळे एसटी बसेस मध्ये प्रवाशांची गर्दी वाढत आहे. आता मोजकेच मुहूर्त शिल्लक आहेत. लग्नसराई ओसरली आहे. त्यामुळे अनेक जण पर्यटन, धार्मिक दर्शनाचा बेत अखतात. समूहाने जाणाऱ्या प्रवासासाठी रापमने पर्यटन बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. प्रवाशांनी आगार व्यवस्थापक, स्थानक प्रमुखाशी संपर्क साधून इच्छुकांनी लाभ घ्यावा. या पर्यटन व सेवेत महिला सन्मान योजने अंतर्गत महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलतीसह अमृत ज्येष्ठ योजना लागू आहे.



# रामचंद्र भंडरवार यांना पुरस्काराने सन्मानित

**देगलूर : (समर्थ गांवकरी)**

दैनिक देशोन्नतीचे ज्येष्ठ पत्रकार रामचंद्र भंडरवार यांना मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक "दर्पण" कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर २०२५ चा आंतरराष्ट्रीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दरवर्षी ज्ञान उदय फाऊंडेशनच्या वतीने दिला जाणारा बाळशास्त्री जांभेकर आंतरराष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट पत्रकार म्हणून मानाचा मानला जाणारा पुरस्कार दैनिक देशोन्नतीचे ज्येष्ठ पत्रकार श्री रामचंद्र भंडरवार यांना नुकतेच सन्मान पत्र, सन्मान चिन्ह, ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले आहे.

केलेल्या कार्याची पोचपावती असल्याचे मनोगत रामचंद्र भंडरवार यांनी व्यक्त केले. पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार अविनाशराव देशपांडे हसनाळकर, प्रा. डॉ. भीमराव माळगे, व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष, निवृत्ती भागवत, ज्येष्ठ पत्रकार अनिल कदम, पत्रकार फजल मुल्ला, प्रा. भीमराव दीपके, मिलिंद कांबळे शिळवणीकर,शेख निजाम गवंडगावकर, शेख रफीक अहेमद, प्रा.रामचंद्र गायकवाड, प्रा. वैजनाथ वानखेडे, संग्राम सोनतोडे, सादीक मरखेलकर, प्रा. नागोराव उतकर, यांच्यासह अनेकांनी, आपले मनोगत व्यक्त करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# कुंटूरकर साखर कारखान्यातील "जय अंबिका भवानी" मंदिराचा वर्धापन दिन ११ व १२ डिसेंबरला सोहळ्याचे आयोजन

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील कुंटूरकर शुगर अँण्ड अँग्रो प्रा. लि.मोहननगर कुंटुर ता.नायगांव येथे जय अंबिका भवानी माता मंदिर स्थापना स्व.माजी मंत्री गंगाधरराव देशमुख कुंटूरकर याचे कुलदैवत आसल्याने या मातेच्या मंदिराची स्थापना केली तो दिवस वर्धापन दिवस दरवर्षी सातत्याने साजरा केला जातो याही वर्षी दि ११ व १२ डिसेंबर रोजी देवीची विधीवत पूजा.पाठ किर्तन.भजन व महाप्रसाद आयोजित केला आहे. जेव्हापासुन या जय अंबिका भवानी मातेची मुर्ती या मंदिरात स्थापन झाली तो दिवस वर्धापन दिवस म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा होत असतो. या वर्षी प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. योगेश महाराज अग्रवाल वसमतकर याचे काल्याचे किर्तनाने सांगता होणार आहे.



या मंदिरात दैनंदिन पूजा-अर्चा व आरती होत आसते.व नवरात्री मध्ये देवीची मंचकी निद्रा आणि अभिषेक नवचेडी पूजा विविध धार्मिक विधी पार पडतात,यामुळे दर्शनासाठी कुंटुर व पँचक्रोशीतील भाविक महिला याची गर्दी याठिकाणी पाहायला मिळते. तर देशमुख कुंटूरकर परिवाराची कुलदैवत कुलस्वामिनी'म्हणून भवानी मातेची पूजा केली जाते. नवरात्रीच्या काळातही देवीच्या संपूर्ण नव रूपात पूजा केली जाते आणि दर दिवशी अनेक धार्मिक विधी पार पडतात. तर नवरात्रात नऊ दिवस भाविकाना महाप्रसादाचे आयोजन केले जाते. जय अंबिका भवानी मंदिर वर्धापन सोहळ्याचे व्यवस्थापक राजेश गंगाधरराव देशमुख कुंटूरकर,चेअरमन. सौ.मधुमती राजेश देशमुख कुंटूरकर.मा.सभापती तथा संचालक.रुपेश गंगाधरराव देशमुख कुंटूरकर.संचालक. उद्धवराव पंतगे देशमुख यानी या कार्यक्रमास या भागातील सर्व भाविक भक्तानी या सोहळ्यात उपस्थित राहुन किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी विनंती कुंटूरकर परिवार गावकरी मंडळी व साखर कारखान्याचे कर्मचारी यांनी केली आहे.

# "शांतता पुणेकर वाचत आहेत" उपक्रमाचे यशस्वी आयोजन

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "शांतता पुणेकर वाचत आहेत" या उपक्रमाचे आदिवासी शिक्षण संस्था जुन्नर संचलित,अनुदानित माध्यमिक आश्रम शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,तळेरान या ठिकाणी यशस्वी आयोजन केल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.राजेंद्र आंबवणे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे यांनी दिली. सदर कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील हिंदीविभागाचे प्रमुख डॉ.राजेंद्र रसाळ यांनी आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.

# घरकुल लाभार्थी सहा महिन्यापासून रामभरोसे

- एकही दमडी नाही
- शिवसेनेकडून १५ डिसेंबर डेडलाईन

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

घरकुल योजनेत लाभार्थ्यांची पिळवणूक चर्चेचा विषय असताना तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना सहा महिन्यापासून एक दमडीही देण्यात आली नाही. यामुळे लाभार्थी गेल्या सहा महिन्यापासून रामभरोसे जीवन जगत असून १५ डिसेंबर पर्यंत रखडलेल्या सहा महिन्याची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा नाही केल्यास गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेनातर्फे (उबाठा) निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या संदर्भात शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दि. १० डिसेंबर रोजी गटविकास अधिकाऱ्यांची



भेट घेऊन मागणीचे निवेदन दिले. तालुक्यातील लाभार्थ्यांनी अनेक वेळा पंचायत समिती कार्यालयात येऊन विनंत्या केल्या, थेट अधिकाऱ्यांना भेटून तसेच दूरध्वनीवरही संपर्क साधले गेले. पण डिएसी बंद असल्याचे किंवा बजेट उपलब्ध नसल्याचे कारण सांगून वेळ मारून नेण्यात येत आहे. जिल्ह्यातील इतर सर्व तालुक्यांमध्ये घरकुल हप्त्यांची रक्कम नियमित वितरित होत असताना केवळ कंधार तालुक्यातच डिएसी बंद कसे ? अशी टीका निवेदनात करण्यात आली आहे.

शिवसेनेने गटविकास अधिकाऱ्यांवर निष्क्रियतेचा आरोप करताना कॉन्ट्रॅक्ट बेसवरील जे.ई. आणि कॉम्प्युटर ऑपरेटर यांच्या संगनमताने बिले काढण्यासाठी लाभधारकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा गंभीर आरोपही केला आहे. १५ डिसेंबर पर्यंत डिएसी सुरु करून सर्व योजनेतील लाभधारकांच्या खात्यावर रक्कम जमा न झाल्यास पंचायत समिती कार्यालयात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. निवेदनावर तालुकाप्रमुख परमेश्वर पाटील जाधव, तालुका संघटक पंडित देवकांबळे, अच्युतराव मेटकर आदींची स्वाक्षऱ्या आहेत.

# राष्ट्रीय लोकशाही आदलातीचे दि १३ डिसेंबर रोजी आयोजन

- सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २५०० थकबाकी मालमत्ताधारकांना नोटीस वाटप

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नावा मनपाच्या वतीने थकबाकी मालमत्ता धारक यांच्या साठी एक दिवसीय जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड, जिल्हा न्यायालय नांदेड यांच्या वतीने दी १३ डिसेंबर रोजी नावा मनपा मुख्यालय येथे राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आले आहे असुन थकबाकी मालमत्ताधारकांना शास्तीवर ८० टक्के सुट देण्यात येणार असून जे थकबाकीदार मालमत्ता कर भरनार नाहीत त्यांच्यावर जप्ती कार्यवाही करण्यात येणार आहे, यासाठी मालमत्ता धारकांनी जप्ती कार्यवाही टाळण्यासाठी मालमत्ता कर भरून सहकार्य करण्याचे आवाहन




सिडको क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी केले आहे. सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जवळपास २५०० थकबाकी मालमत्ता धारकांना मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त अजितपाल संधु, सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या अधिपत्याखाली कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, वरीष्ठ लिपीक ,मिना अडबलवार, मोहन लांडगे,कर निरीक्षक संजय नागापूरकर,वसंत कल्याणकर, सादुला खॉन,नारायण आठवले, मारोती सारंग, लिपीक मालु एनफळे ,प्रकाश दर्शने,रमेश यशवंतकर, ऊतम जौधंळे, राहुल पाईकराव,दिपक जोंधळे, रविंद्र पोवळे,यांच्या सह लिपीक हे थकबाकी मालमत्ता धारक व पाणीपट्टी थकबाकी यांना एकुण १० कोटी २८ लाख ६७, ३६७ थकबाकी नोटीसा २५०० मालमत्ता धारकांना वाटप केल्या आहेत.

जे थकबाकीदार मालमत्ता कर भरणार नाहीत, त्यांची मालमत्ता जप्त करण्यात येणार असल्याचे सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी सांगितले.

# प्रेमसंबंधाचे नाटक करून तरूणीवर अत्याचार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

प्रेमसंबंधाचे नाटक करून पीडित महिलेवर बळजबरीने वारंवार अत्याचार केल्याचा आणि त्यानंतर जातीवरून हिणवून लग्नास नकार देत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका तरुणासह चौघांवर अहिल्यानगरच्या कॅम्प पोलिस स्टेशनमध्ये विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला, श्रीगोंदा येथील रहिवासी आहे. संकेत हिरालाल पाटील (रा. धुळे) या तरुणाने पीडितेशी भावनिक नाते जोडून वेळोवेळी प्रेमाचे नाटक केले. लग्नाचे खोटे आश्वासन देत तिच्या संमतीशिवाय वारंवार तिच्यावर लैंगिक अत्याचार केले.यामुळे पीडिता गर्भवती झाली असता, आरोपीने तिला गर्भपाताच्या गोळ्या दिल्या.

# दोन दिवस थंडीच्या लाटेचा येलो अलर्ट

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत कडाक्याची थंडी पडत असून अनेक ठिकाणी किमान तापमान ७ अंश सेल्सिअसपेक्षा खाली गेल्याचे भारतीय हवामान खात्याच्या नोंदीवरून स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर, हवामान खात्याने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी मंगळवार दि.९ ते ११ डिसेंबर या कालावधीत थंडीचा येलो अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात थंडीची तीव्र थंडीची लाट येण्याची शक्यता वर्तविली आहे.

दरम्यान, मंगळवारी दिवसभर जिल्ह्यात कमाली थंडी जाणवली. सायंकाळी सहानंतर अनेक ठिकाणी थंडीत वाढ झाल्याचे दिसून आले. हवामान विभागाने पुढील दोन दिवस थंडीच्या अर्लट दिल्याने नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात काल जेऊर (करमाळा) येथे ६ अंश, यवतमाळ



९ अंश आणि गोंदिया या ठिकाणी ८.६ अंश तापमानाची नोंद झाली आहे. तर थंडीच्या लाटे सदृश्य स्थिती नागपूर ८.८ अंश, भंडारा ९ अंश, वाशिम १०.८ अंश, डहाणू १५.५ अंश असे तापमान होते. तर एकांकी किमान तापमान अहिल्यानगर ७.४ तापमान, नाशिक ९.३ अंश, पुणे ८.९ अंश, नांदेड ९.७ अंश अशा तापमानाची नोंद झाली असल्याची माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

# उड्डाण पुलावर अज्ञात वाहनाची धडक; एकजण गंभीर जखमी



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्यावर भोकरफाटा येथील उड्डाणपूलावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात सोमवारी रात्री झाला असून एकाची प्रकृती चिंताजनक आहे. अर्धापूर ते नांदेड मार्गे जाणाऱ्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिली. सदर घटना दाभड येथील उड्डाणपूलावर दि.८ सोमवार रोजी रात्री ७-८ वाजताच्या दरम्यान घडली. अपघातात दुचाकीस्वार सिद्धार्थ गंगाधर वगर (वय ४३) रा.निमगाव स्टेशन ता.जिल्हा नांदेड यांना जबरदस्त मार लागला. या अपघाताची माहिती मिळताच नरेंद्राचार्य संस्थान रूग्णवाहीका चालक राजू पाचंगे यांनी जखमीस नांदेड येथील रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून दुचाकीस्वार सिद्धार्थ वगर यांची प्रकृती चिंताजनक आहे.

# प्रथमच आफ्रिकन स्वाइन फिवर आढळल्याने जिल्हा प्रशासन सतर्क

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील साकुरी येथे डुकरांना आफ्रिकन स्वाइन फिवरची लागण झाली आहे. या विषाणूजन्य आजाराने साकुरीत डुकरांचा बळी घेतल्यानंतर जिल्हाधिकार्‍यांनी येथील एक किलो मीटरचा परिसर बाधित व निगराणी क्षेत्र म्हणून घोषित केला आहे.

प्रशासनाकडून तेथील मृत व जिवंत डुकरांची विल्हेवाट लावली जात आहे. पशूसंवर्धन विभागाने आतापर्यंत १० डुकरांना दयामरण दिलेले असून साकुरीचा बाधित भाग राहाता नगर पालिकेच्या हद्दीपर्यंत येत असल्याने (दि.९, मंगळवार) राहाता पालिका हद्दीत आफ्रिकर स्वाइन फिवरची लागण झालेल्या डुकरांची शोध मोहिम राबवण्यात येणार आहे. तसेच संनियंत्रण



भागात येणार्‍या डुकरांचे कलिंग करण्यात येणार आहे.

आफ्रिकन स्वाइन फिवर आढळल्याने जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे. यापूर्वी नाशिक जिल्ह्यात या आजाराची लागण झाली होती. डुकरांना होणार्‍या या फिवरमुळे लोकांना धोका नाही. परंतू खबरदारी म्हणून मांस विक्रीवर बंदी, तसेच बाधित भागाच्या एक किलो मीटर त्रिज्येत, तसेच १० किलोमीटर त्रिज्येच्या परिसरास संनियंत्रण क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येवून इतरही उपाययोजना जिल्हा प्रशासनाच्यावतीने हाती घेण्यात आल्या आहेत. गेल्या महिन्यांत राहाता तालुक्यातील साकुरी गावातील काही डुकरांचा अनैसर्गिक मृत्यू झाल्याचे समोर आले.त्याचे नमुने पशुसंवर्धन विभागाने तपासणीसाठी भोपाळ येथील राष्ट्रीय प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले. त्याचा अहवाल नुकताच प्राप्त झाला आहे. ते सर्व नमुने बाधित आढळून आल्याने प्रशासनाची धावपळ सुरू आहे. साकुरीत एका व्यक्तीने बंदिस्त वराह पालन केले होते.

त्यामुळे ही बाब निदर्शनास आली. भटकी डुकरे दगावली असती तर आफ्रिकन फिवर समोर येण्यास उशीर झाला असता. दरम्यान, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर साकुरी येथील जिवंत डुकरांचे शास्त्रीय पद्धतीने कलिंग (दया मरण) केले जात आहे. साकुरीत आतापर्यंत शोधून शोधून १० डुकरांचे कलिंग करण्यात आले आहे. साकुरीतील बाधित आणि संनियणातील काही भाग राहाता नगर पालिका हद्दीत येत आहे.

यामुळे पशूसंवर्धन उपायुक्त उमेश पाटील यांनी सोमवारी राहाता नगर पालिका मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत बैठक घेवून आजपासून नगर पालिका हद्दीतील डुंकराचा शोध घेवून त्यांचे कलिंग करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. यामुळे साकुरीतील डुकरे हे राहात्यासाठी ताप ठरणार आहेत.

करोना कोविड प्रमाणे आता स्वाइन फिवर असणार्‍या साकुरी आणि राहाता पालिकेच्या भागात सोडियम हायड्रोक्लोराइड, हायपोक्लोराइट, क्लोरिनची फवारणी करून परिसर निर्जंतुकीकरण केला जात आहे. तसेच यापूर्वी आणि यापूढे मारल्या जाणार्‍या डुकरांना प्रतिकिलोप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाणार आहे. त्यासाठी त्यांचे वजन केले जात असल्याचे पशूसंवर्धन विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

जिल्ह्यातील अनेक गावात सध्या मोकाट आणि पाळण्यात येणार्‍या डुकरांच्या नोंदी नाहीत. पशूसंवर्धन विभागाच्या २० व्या पशूगणेत जिल्ह्यात एकही डुकर नसल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. अनेक ठिकाणी व्यापारी अथवा विशिष्ट समाजातील व्यक्त नाशिक आणि अन्य जिल्ह्यातून दोन महिने वय असणारी डुकरांची पिल्ले आणून ती बंदिस्त अथवा गावात सोडून त्यांना मोठे करतात आणि नंतर पकडून ते मांसविक्रीसाठी पाठवून देतात. गाव पातळीवर त्यावर कोणाचे नियंत्रण नसल्याने संसर्गजन्य रोगाचा धोका वाढला असून स्थानिक प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याच्या अनेक ठिकाणच्या तक्रारी आहेत.

# मुंबईमध्ये जनरेटरचे भव्य स्वागत

■ अशोक लेलँड कंपनीचे ओ.इ.एम. घाटगे करकेरा व आदर्श इंजिनिअरिंग कंपनीने निर्माण केला नवा मानदंड!

**नवी मुंबई :** (समर्थ गांवकरी)

गाड्या, यंत्रणा किंवा विविध वस्तू आल्या की त्यांचे पूजन केले जाते—हे आपण सर्वांनी पाहिले आहे. परंतु मुंबईमध्ये आज एक वेगळाच आणि आगळा-वेगळा सोहळा अनुभवायला मिळाला. आदर्श इंजिनिअरिंग कंपनीने अशोक लेलँड – घाटगे करकेरा पॉवर इंडस्ट्रीजच्या जनरेटरचे अत्यंत थाटामाटात, वाजतगाजत भव्य स्वागत करून हा सोहळा अनोखा ठरवला.

अनेक वर्षांपासून ग्राहकांचा परमोच्च विश्वास संपादन करणाऱ्या अशोक लेलँड कंपनीचा कोकणापासून मुंबईपर्यंत मजबूत दरारा आहे. कोणतीही नवी गाडी किंवा यंत्रणा घ्यायची असेल तर ग्राहकांचे लक्ष सर्वप्रथम या कंपनीकडेच वळते. त्यातच घाटगे करकेरा कंपनीचे दीर्घकाळापासूनचे तात्काळ सेवा देण्याचे धोरण ग्राहकांसाठी वरदान ठरते.




आज ग्रॅण्ड पीलोन येथे आयोजित सोहळ्यात आदर्श इंजिनिअरिंग कंपनीचे संचालक दशरथ चव्हाण आणि त्यांच्या टीमने नव्या जनरेटरचे फुलांनी, जल्लोषात स्वागत केले. "आमच्या घरी आलेला तो आमचा सहकारी आहे; तो व्यवसायात मदत करणारच. त्यामुळे त्याचे स्वागत करणे हे आमचे कर्तव्यच," असे दशरथ चव्हाण यांनी सांगितले.

सोहळ्यात कमलेश (रिजनल हेड), वरुण सर (घाटगे करकेरा), टीम लीडर राहुल कदम यांची विशेष उपस्थिती होती. या भव्य स्वागत सोहळ्याची चर्चा आज संपूर्ण महाराष्ट्रात रंगली आहे. व्यवसायात वीजपुरवठा खंडित होणे म्हणजे अडथळा. म्हणून "संकटकाळी साथ देणारा खरा मित्र" हा संदेश देत आजही जनरेटरला व्यवसायिकांकडून मोठा मान मिळतो. सौर ऊर्जा प्रकल्प वाढत असले तरी तातडीच्या प्रसंगी 'जे उपयोगाचे ते खरे'—अशीच धारणा अनेक व्यावसायिकांची आहे. अशोक लेलँड–घाटगे करकेरा पॉवर इंडस्ट्रीजने कोकण व मुंबई विभागात तात्काळ सेवा, विश्वासू यंत्रणा आणि गुणवत्तेच्या बळावर मागील अनेक वर्षांत आपली स्वतंत्र छाप निर्माण केली आहे. "कॉल केल्यानंतर तात्काळ सेवा देणे हीच आमची ओळख. ग्राहकांचा विश्वास हेच आमचे भांडवल," असे संचालक दशरथ चव्हाण यांनी सांगितले. मुंबईत आज चर्चेचा विषय ठरला, अशोक लेलँड कंपनीच्या जनरेटरचे फुलांनी सजलेले, भव्य, दिव्य स्वागत!

# ठाण्यात श्रीमद भागवत कथा महापुराण सोहळ्याला भाविकांची गर्दी

## डॉ. विश्वासराव आरोटे यांची प्रेरणादायी उपस्थिती!

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील ठाणे शहरात थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीबाई ठक्कर ठाणावाला यांच्या संकल्पनेतून विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद भागवत कथा यज्ञ महापुराण सोहळ्याला भाविकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. भागवताचार्य डॉ. संत बुजभूषण दास महाराज, वृंदावन यांच्या प्रभावी वाणीने सजलेल्या या महाकथा सोहळ्याचा लाभ हजारो–लाखो भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने घेतला.



या पवित्र सोहळ्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उपस्थित राहून भाविकांना प्रेरित केले. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष उत्साह लाभला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व मान्यवर म्हणून माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे, हरिभक्त परायण पांडुरंग महाराज वावीकर यांचीही मानाची उपस्थिती लाभली.

यावेळी विविध मान्यवरांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यात प्रामुख्याने: दिनेश भाई ठक्कर, राजेंद्र पांडे, राजेंद्र पुराणीक, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, फिरोज भाई आर. पटेल, सुरेश भाई ठक्कर यांनी उपस्थिती दाखवून आयोजकांचे मनोबल वाढवले.

# पुणे–नाशिक हायस्पीड रेल्वेची मागणी जोरात!

■ आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या नेतृत्वात विधानभवनाजवळ लक्षवेधी आंदोलन!

**नागपूर :** (समर्थ गांवकरी)

पुणे–नाशिक हायस्पीड रेल्वेचा मार्ग पहिल्या प्रस्तावानुसार नाशिक–सिन्नर–अकोले सरहद्–संगमनेर–आळेफाटा–पुणे असा व्हावा, या अत्यंत महत्त्वाच्या मागणीसाठी आज नागपूर अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी विधानभवन परिसरात भव्य आणि लक्षवेधी आंदोलन झाले.




या आंदोलनात अकोले विधानसभेचे आमदार डॉ. किरणजी लहामटे यांनी पुढाकार घेत नेतृत्व केले. अकोले तालुक्याचा हक्काचा मार्ग संरक्षित करण्यासाठी त्यांनी ठाम भूमिका मांडली.

आमदार डॉ. लहामटे यांनी आंदोलनात सांगितले की, हायस्पीड रेल्वेने पुणे–नाशिक प्रवास कमी वेळेत होण्यासाठी मूळ प्रस्ताव अपरिहार्य आहे. मार्गात बदल झाल्यास संपूर्ण प्रकल्पाचा उद्देश बाधित होईल.

अकोले तालुक्यातील हजारो विद्यार्थी, कामगार वर्ग दररोज पुणे–नाशिकला ये-जा करतो, त्यांना या मार्गाचा मोठा फायदा होणार आहे.

शेतीमालाची देवाणघेवाण, वाहतूक, व्यापार आणि उद्योग क्षेत्रात मोठी वाढ होईल.

अकोले परिसरातील पर्यटन उद्योगालाही मोठी चालना मिळणार असून युवकांसाठी नवीन रोजगार संधी निर्माण होतील. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, रेल्वे मार्ग बदलण्याचा कोणताही प्रयत्न मान्य केला जाणार नाही.

अधिवेशन संपल्यानंतर या मागणीवर पुढील कारवाईसाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेण्याचे आमदार डॉ. लहामटे यांनी जाहीर केले. आजच्या आंदोलनातून "अकोले सरहद्द मार्गेच हायस्पीड रेल्वे जा!" ही मागणी जोरदारपणे अधोरेखित करण्यात आली.

# लक्ष्मीबाई वाडेकर यांचे निधन

**पुणे :** (समर्थ गांवकरी)



शिव, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीतील नेते, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) महाराष्ट्र प्रदेश संघटन सचिव परशुराम वाडेकर यांच्या मातोश्री व आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या लक्ष्मीबाई बाळकृष्ण वाडेकर यांचे आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या ८७ वर्षांच्या होत्या. पुण्याच्या माजी उपमहापौर सुनिता परशुराम वाडेकर आणि हवेली तालुक्याच्या मंडलाधिकारी वर्षा आप्पासाहेब वाडेकर यांच्या त्या सासू होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना - नातवंडे असा परिवार आहे. लक्ष्मीबाई वाडेकर या मराठवाडा विद्यापीठ नामांतर आणि इंदू मिल यासह विविध सामाजिक आंदोलनात सक्रिय सहभागी होत्या.

# कोतुळमध्ये माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सखाराम गंभीरे यांच्या दवाखान्याला भीषण आग!

**कोतुळ :** (समर्थ गांवकरी)

खटपट नाका-बोरी रोडलगत असलेल्या माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सखाराम आर. गंभीरे (M.B.B.S.) यांच्या दवाखान्याला आज सकाळी साधारण नऊ वाजण्याच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. दवाखान्याच्या इमारतीतून मोठ्या प्रमाणात धूर निघताना दिसताच परिसरात एकच गोंधळ उडाला.

डॉ. गंभीरे हे शासनसेवेतून निवृत्त झाल्यानंतर कोतुळ येथे अत्यंत कमी शुल्क आणि कमी दरातील औषधोपचार देण्यासाठी दवाखाना चालवत होते. तीन मजली इमारतीच्या तळमजल्यावर दवाखाना, पहिल्या मजल्यावर कुटुंबीयांचे वास्तव्य आणि तिसऱ्या मजल्यावर कपडे तसेच घरगुती साहित्य ठेवलेले होते.



सकाळी झालेल्या शॉर्टसर्किटमुळे तिसऱ्या मजल्यावरील घरगुती साहित्य, काही कागदपत्रे आणि औषधसामग्रीला अचानक आग लागली. काही क्षणांतच ज्वाळांनी तिसरा मजला वेढल्याने मोठ्या प्रमाणात वस्तू खाक झाल्या. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

घटनेची माहिती मिळताच 'खटपट नाका तरुण मित्र मंडळा'तील तरुणांनी तात्काळ धाव घेतली. इमारतीच्या मागील बाजूने वर चढत गच्चीवरील दरवाजा तोडण्यात आला. त्यानंतर पाण्याच्या टाकीतून बादल्या भरून साखळी पद्धतीने पाणी वर पोहोचवत तरुणांनी आग विझवण्यात मोठे यश मिळवले. त्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

आगीचे कारण प्राथमिक तपासात लाईटच्या शॉर्टसर्किटमुळे झाल्याचे समजते. अधिकाऱ्यांनी स्थलावर पंचनामा सुरू केला असून नुकसानीचे प्रमाण अद्याप समोर येत आहे.

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तरुणांच्या धाडसाचे कौतुक केले असून डॉ. गंभीरे यांच्या सेवाभावी कार्याबद्दल सहानुभूती व्यक्त केली आहे.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/५३/२०२५ — अकोले दि. १०/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. काशिनाथ काळु धोंगडे, रा.मान्हेरे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे वडील कै. काळु रामा धोंगडे यांचा मृत्यू दि. १९/११/१९९६** रोजी **मौजे मान्हेरे** येथे झाला असुन त्यांच्या **वडीलांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मान्हेरे**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. भांगरे सोमनाथ बुधा, रा.साकीरवाडी**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांचे वडील कै. काळु रामा धोंगडे यांचा मृत्यू दि. १९/११/१९९६** रोजी **मौजे मान्हेरे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मान्हेरे**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १०/१२/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**



# कार्डियाक केअर सेंटरचे उद्घाटन

**मुंबई :** (समर्थ गांवकरी)

अॅडव्हान्स्ड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, विलेपार्ले (पश्चिम) येथे आज एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. हॉस्पिटलने आपले अत्याधुनिक टर्शियरी कार्डियाक केअर सेंटर (तृतीय श्रेणी हृदयविकार काळजी केंद्र) सुरू केले, ज्यामुळे पश्चिम उपनगरातील (जुहू, मुंबई) प्रमुख मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये (अनेक विशेष सेवा देणारे रुग्णालय) त्याचे स्थान आणखी मजबूत झाले आहे.

या उद्घाटन समारंभाला बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ यांनी खास उपस्थिती लावली आणि त्यांनी औपचारिकरित्या या नवीन हृदयविकार सुविधेचे अनावरण केले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ अभिनेते परेश रावल यांच्यासह डॉ. जिगिशा देसाई (संचालक), डॉ. आशिष गोखले (सीईओ), श्री. अमान आणि इतर प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

नव्याने स्थापन झालेले कार्डियाक सेंटर अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे, ज्यात पुढील पिढीच्या निदान प्रणाली, संपूर्णपणे एकात्मिक कॅथेटेरायझेशन प्रयोगशाळा, आणि विशेष कार्डियाक क्रिटिकल केअर युनिट्स (हृदयविकारासाठी अतिदक्षता विभाग) यांचा समावेश आहे. हे सेंटर वरिष्ठ हृदयरोगतज्ज्ञ, कार्डिओथोरॅसिक सर्जन (हृदय व छातीच्या शस्त्रक्रिया करणारे सर्जन) आणि प्रशिक्षित कार्डियाक केअर व्यावसायिकांच्या बहु-अनुशासनात्मक टीमद्वारे चालवले जाईल.

# दोन केंद्रात बदल

**नांदेड जिल्हा :** (समर्थ गांवकरी)


स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी २०२५ च्या एम.कॉम पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा १२ डिसेंबर, २०२५ पासून सुरू होत आहेत. यासाठी यशवंत महाविद्यालय, नांदेड आणि पीपल्स महाविद्यालय, नांदेड या दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र के.आर.एम. महिला महाविद्यालय, नांदेड येथे निश्चित करण्यात आले होते. मात्र, काही तांत्रिक कारणांमुळे विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र बदलण्यात आले असून आता दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची परीक्षा पीपल्स महाविद्यालय, नांदेड येथे घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर पूर्वीप्रमाणे के.आर.एम. महिला महाविद्यालयाचे नाव छापलेले असले, तरीही त्याच प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांना पीपल्स महाविद्यालय, नांदेड येथे परीक्षा देण्यास परवानगी देण्यात आली आहे.

# मिळालेला पुरस्कार सक्षम टाटे यांना समर्पित

## सिद्धांत चतुर्वेदी

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

सिद्धांत चतुर्वेदीने आंतरजातीय हत्येतील पीडित सचिन (सक्षम) टाटे यांना पुरस्कार समर्पित केला, ही अर्थात वाखाणण्याजोगी बाब आहे. तो म्हणाला, हा सन्मान ज्या लोकांनी फक्त अस्तित्वासाठी लढा दिला, त्यांचा आहे. 'धडक २'साठी पॉवर पॅक्ड परफॉर्मर ऑफ द इयर हा पुरस्कार जिंकलेल्या अभिनेता सिद्धांत चतुर्वेदीने हा सन्मान महाराष्ट्रातील आंतरजातीय मानहानी हत्येतील पीडित सक्षम टाटे यांना अर्पण केला. नुकताच नांदेड जिल्ह्यात घडलेल्या या घटनेने देशभरात संतापाची लाट उसळली असून जातीय भेदभावावरील चर्चा पुन्हा पेटल्या आहेत. 'धडक 2'मध्ये सिद्धांतने नीलेश, एका दलित तरुणाची भूमिका साकारली आहे.



जो व्यवस्थात्मक अत्याचारांशी झुंज देतो. ही भूमिका भावनिक प्रामाणिकतेसाठी, तसेच वंचित समाजांच्या भीती, स्वाभिमान आणि संघर्षाचे वास्तव चित्रण करण्यासाठी विशेष कौतुकास पात्र ठरली आहे. पुरस्कार स्वीकारताना सिद्धांत म्हणाला, "हा पुरस्कार फक्त माझा नाही. तो त्या प्रत्येकाचा आहे ज्यांना कधी ना कधी अस्पृश्य मानले गेले, दूर ढकलले गेले, भेदभाव सहन करावा लागला पण तरीही उभे राहण्याचे, लढण्याचे आणि केवळ अस्तित्वाचा अधिकार मागण्याचे धैर्य त्यांनी दाखवले. आणि शेवटी, हा सन्मान मी दिवंगत सक्षम टाटे आणि त्यांच्या कुटुंबीयांना आणि आंचलला समर्पित करतो. माझी सहानुभूती तुमच्यासोबत आहे". सिद्धांतच्या या भावनिक श्रद्धांजलीने सोशल मीडियावर तत्काळ लक्ष वेधून घेतले. अनेकांनी त्याच्या या भूमिकेचे स्वागत केले व म्हटले की, सक्षम टाटे प्रकरणानंतर 'धडक २' आणखीनच प्रासंगिक आणि तातडीची वाटते. नांदेडजवळील गावातील २१ वर्षीय सक्षम टाटे यांची काही दिवसांपूर्वी आंतरजातीय नातेसंबंधामुळे हत्या करण्यात आली. या प्रकरणामुळे ग्रामीण आणि उपनगरांत होणाऱ्या मानहानी हत्यांबाबतचे प्रश्न आणि तरुण जोडप्यांच्या सुरक्षेवरील चर्चा पुन्हा एकदा पुढे आल्या आहेत.

दरम्यान, सिद्धांत आता आपल्या करिअरमधील पुढच्या मोठ्या टप्प्याकडे वाटचाल करतो आहे. चित्रपटकार व्ही. शांताराम यांच्या बायोपिकमध्ये मुख्य भूमिका साकारत आहे.

## जाहीर नोटीस

**मे.ए.एम.हुसेन कोर्ट, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, जुन्नर, जि.पुणे**

दि.कि.अ.नं.५३/२०२५ — निशाणी –०८

**अर्जदार.........रंजना गौतम जगधने**, रा.मोग्रस, ता.अकोले, जि.अहमदनगर

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी **भारतीय वारसा कायदा १९२५** अन्वये या कोर्टाकडे मयत **विमल तुकाराम लोखंडे** मृत्यू दि. ०९/०५/२०२१ **यांचे हेअरशीप सर्टिफिकेट** मिळण्यासंबंधीचा अर्ज केलेला आहे.

**शेअर्सचे वर्णन – विमल तुकाराम लोखंडे** यांची उदापूर शिवारातील मिळकत पुढीलप्रमाणे–

| गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार |
|---|---|---|
| ११७३ पै. माझे अविभक्त हिश्याची ०.२७.५ आर क्षेत्र | ०.५५ पो.ख. ०.०१ | १.७५ |
| ११८८ मधील माझे अविभक्त हिश्याची असलेली मिळकत | ०.७६ पो.ख. ०.०१ | २.९५ |
| २०५ मधील माझे अविभक्त हिश्याची असलेली मिळकत | ०.६८ पो.ख. ०.०३ | २.५६ |
| १०८ मधील माझे अविभक्त हिश्याची असलेली मिळकत | १.७६ पो.ख. ०.११ | ५.४३ |

| ग्रा.पं. मि.नं. | वर्णन | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५५६ | १८ बाय १५ फुट दगड, वीट, चुना /सिमेंट छप्पर, सिमेंट पत्रा एकूण क्षेत्रफळ २५.०९ चौ.मी | ४६९९.०० |

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी दि. ०८/०१/२०२६ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता स्वतः किंवा वकीलामार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दि. ०९/१२/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमान्वये,**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर पुणे**

# गोवंशाच्या रक्ताचा थेंब भारत भूमीवर सांडणार नाही, त्या दिवशी सनातन धर्माचा ध्वज संपूर्ण विश्वात फडकेल!

## श्री स्वामी राजेंद्रदास देवाचार्यजी महाराज यांचे प्रतिपादन

**तामसा :** (समर्थ गांवकरी)

कलियुगात मोठ्या प्रमाणात धार्मिक कथा, उत्सव, महोत्सव, यज्ञ सोहळ्याचे आयोजन होत आहे. अन्नदानाचे मोठे कार्य होत आहे. परंतु शास्त्रानुसार कर्म सत्कर्माची अनुभूती येत नाही. युग परिवर्तन होत नाही. याचे कारण म्हणजे भारत भूमीवर मोठ्या प्रमाणात गोवंशाचे रक्त सांडले जात आहे. गोवंशाचा तिरस्कार आणि गो हत्येचे हे दुष्परिणाम आहेत. ज्या दिवशी भारतभूमी गोवंशाच्या हत्तेपासून मुक्त आणि निष्कलंक होईल. त्या दिवशी सनातन धर्माचा ध्वज संपूर्ण विश्वात गर्वाने फडकेल! असे प्रतिपादन परमपूज्य श्री स्वामी राजेंद्रदास देवाचार्यजी महाराज यांनी केले. गोदावरी परिक्रमानिमित्त श्रीक्षेत्र पिंपळगाव दत्त मंदिर येथील प्रवचनात ते बोलत होते.

गोदावरी परिक्रमानिमित्त श्रीक्षेत्र पिंपळगाव दत्त मंदिरात रविवार सोमवार दोन दिवस मुक्कामी आलेले परमपूज्य श्री स्वामी राजेंद्रदास देवाचार्यजी महाराज यांचे सोबत साडेतीनशे साधू - संत महंत उपस्थित होते. श्रीक्षेत्र पिंपळगाव दत्त मंदिराचे महंत गोवत्स सद् धर्म शिरोमणी बालयोगी परमपूज्य श्री व्यंकटस्वामी महाराज यांनी उपस्थित साधू - संत, महंतांचे जल्लोषात स्वागत केले. सोमवारी झालेल्या प्रवचनात बोलतांना श्री स्वामी राजेंद्रदास देवाचार्यजी महाराज म्हणाले, कलियुगात गोदावरी परिक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

प्रभू श्रीरामचंद्र यांनी गोदावरीच्या पावन भूमीत १२ वर्षे वास्तव केले आहे. अनेक साधू - संत, महंत, ऋषीमुनींनी गोदावरी नदीच्या तीरावर तपश्चर्या, आराधना केली आहे. ते पुण्य प्राप्त करण्यासाठी गोदावरी परिक्रमा करणे मानवी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कलियुगात धार्मिक उत्सव - महोत्सव, यज्ञ, सत्संगातून युग परिवर्तन शक्य आहे.



भारत भूमीत गोहत्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. याकडे शासन प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांनी गो ब्राह्मण, प्रतिपालक या संकल्पनेतून स्वराज्य स्थापन केले होते. शिखांचे धर्मगुरू गुरु गोविंदसिंग यांनी गो हत्येच्या पापातून भारतभूमीला मुक्त करण्याची प्रतिज्ञा केली होती.

त्यांचे विचार कलियुगात आचरणात आणण्याची गरज असल्याचे श्री स्वामी राजेंद्रदास देवाचार्यजी महाराज म्हणाले. दि. ६ डिसेंबरपासून गोदावरीचे उगमस्थान त्रंबकेश्वरपासून परिक्रमेला प्रारंभ झाला. २१ डिसेंबरला त्र्यंबकेश्वर येथे सांगता होणार आहे.

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूच्या काही भागातून परिक्रमा पूर्ण होणार असे महाराज म्हणाले. प्रवचन सोहळ्यात हजारो भाविकांची उपस्थिती होती.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# इगतपुरी नगरपरिषदेच्या निकालाची उत्सुकता

इगतपुरीत धनुष्यबाण व त्र्यंबकेश्वर मध्ये घड्याळ अशी युती खासदार हेमंत गोडसे यांनी घडवून आणली आहे. इगतपुरी नगर परिषदेमध्ये राष्ट्रीयवादी अजितदादा गटाच्या वतीने नगरसेवक पदासाठी उमेदवार रिंगणात होते तर त्र्यंबकेश्वर मध्ये नगरध्यक्ष पदासाठी घड्याळाचा उमेदवार दिला तर नगरसेवक पदासाठी शिवसेनेच्या वतीने नगरसेवक पदाचे उमेदवार देऊन युती करण्यात आली आहे. दरम्यान इगतपुरी नगरध्यक्षपद जर शिवसेनेकडे आले तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्फत पर्यटन नगरी त लवकरच रूपांतर होईल अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे.

- धनुष्यबान तर कमळ व पंजा मध्ये तिरंगी लढत
- कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन व माझी खासदार हेमंत गोडसे यांची प्रतिष्ठा पणाला

**इगतपुरी :** (समर्थ गांवकरी)

इगतपुरी नगर परिषदेच्या निवडणुकीत धनुष्यबाण येणार की पंजा का कमळ अशी चर्चा सर्वत्र आहे प्रत्येक पक्षाने दंड थोपटत आपलाच उमेदवार तथा नगरध्यक्ष निवडून येईल असे सांगत आहे.

नगरपरिषद निवडणुकीत धनुष्यबाण सुटणार की पंजा का कमळ फुलणार हे चित्र मात्र २१ तारखेला स्पष्ट होणार असले तरी इगतपुरी तालुक्यात धनुष्यबनाची चर्चा मात्र जोर धरू राहिली आहे. गेल्या ३५ वर्षापासून इगतपुरीत एकहाती सत्ता टिकून ठेवणारे माजी नगराध्यक्ष संजयभाई इंदुलकर हे उबाठाचे एकनिष्ठ नगरध्यक्ष म्हणून सत्ता उपभोगत होते मात्र अचानक भाजप प्रवेशाने इगतपुरी चे चित्र वेगळेच झाले आहे. एकंदरीत गेल्या 35 वर्षापूर्वी उभाठा च्या वतीने धनुष्यबाणाच्या चिन्हावर निवडून आलेले इंदुलकर यांनी भाजपात प्रवेश करून नगरध्यक्ष पदासाठी उमेदवारी केली नसून नगरसेवक पदासाठी उमेदवारी केली व भाजपच्या वतीने मधुमालती मेंद्रे यांना नगरध्यक्षाची उमेदवारी देऊन चित्र वेगळे केले आहे. मात्र शिवसेनेच्या वतीने माजी खासदार हेमंत गोडसे यांनी संजय खातळे यांच्या पत्नी शालिनी खातळे यांनी नगरध्यक्ष पदाची उमेदवारी दिली आहे. अगदी शेवटच्या क्षणाला माजी खासदार हेमंत गोडसे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित शालिनी खातळे यांनी प्रवेश करत इगतपुरीच्या विकासासाठी धनुष्यबाण हाती घेत निवडणुकीत रंगत आणली आहे.

माजी खासदार हेमंत गोडसे यांनी घेतलेल्या निर्णय हा इगतपुरी नगरपरिषदेवर धनुष्यबाण लावणार अशी जोरदार चर्चा आहे.

विशेष म्हणजे इगतपुरी तालुक्यात गेल्या तीन वर्षात धनुष्यबाणाकडे कुठल्याच प्रकराची ताकद नसताना माजी खासदार हेमंत गोडसे यांच्या नेतृत्वाखाली इगतपुरी नगर परिषदेत अस्तिव नसताना देखील एक नगरध्यक्ष व 21 नगरसेवक पदासाठी उमेदवार रिंगणात उभे केले आहे व नाशिक जिल्हात मोठ्या प्रमाणात इन्कमिंग सुरुच राहिली अन आता पहिल्यांदाच इगतपुरी नगरपरिषदेवर धनुष्यबाण येणार अशी जोरादर चर्चा आहे.

इगतपुरी नगरपरिषदेची निवडणूक 'हॉट' अशा 'स्पॉट' वरुन पोहचली आहे. नगरअध्यक्ष पदासाठी 4 तर नगरसेवक पदासाठी 70 उमेदवार 21 जागेसाठी रिंगणात होते तर या राज्यात महायुती असली तरी भाजपाने 'एकला चलो रे..'चा नारा दिला असून शिंदेसेना व दादांच्या राष्ट्रवादीने वेळेवर युती करत माजी खासदार हेमंत गोडसे यांनी धनुष्यबाणा ला नगरध्यक्षाची उमेदवारी साठी राष्ट्रवादी अजितदादा गटाची युती घडवून आणत नगरध्यक्ष पदाचा उमेदवार आपल्या पदरात पडून घेतला आहे. तर काँग्रेस, उबाठा व राष्ट्रवादी शपा.ची महाविकास आघाडी नावालातरी एकसंघ दिसत होती. तर वंचीत बहूजन आघाडीने स्वतंत्र उमेदवार उभा केला आहे.

पर्यटन भूमी असल्यामुळे भाजपासाठी ही जागा प्रतिष्ठेची नाहीतर 'अस्मीतेची' आहे, त्यात दस्तरखुद्द कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन तळ ठोकून होते.

नवख्या असलेल्या उमेदवार मधुमालती मेंद्रे यांच नाव तस नवीन च मात्र कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन व माजी खासदार हेमंत गोडसे यांनी शालिनी खातळे यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठची केली होती त्यामुळे या निवडणुकीत माजी खासदार हेमंत गोडसे विरुद्ध मंत्री गिरीश महाजन यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे असे चित्र दिसत आहे.

## थोडक्यात बातम्या...




### श्री सत्य साई रन अँड राईडने एकात्मतेची भावना जागवत हजारोंना दिली प्रेरणा

पुणे (स. गांवकरी) : सकाळच्या मंद वाऱ्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऐतिहासिक परिसराला स्पर्श करताच, पुणे शहरात उत्साह, ऊर्जा आणि भक्तीची प्रचंड लाट उमटली. भगवंत श्री सत्य साई बाबा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'श्री सत्य साई रन अँड राईड' या भव्य उपक्रमाचे आयोजन श्री सत्य साई सेवा संस्था, महाराष्ट्र (पश्चिम) यांनी केले होते. या उपक्रमाच्या उदात्त हेतूचा गौरव म्हणून युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने फिट इंडिया माध्यमातून देशभर या कार्यक्रमाला समर्थन दिले आहे.




### जागतिक डिजिटल डिटॉक्स दिन उत्साहात साजरा

पुणे (स. गांवकरी) : डिजिटल उपकरणांच्या अतिवापराने तुटलेल्या मानवी संबंधांना पुन्हा जोडण्यासाठी आणि मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी 'झेप फाउंडेशन' आणि 'स्वान फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक डिजिटल डिटॉक्स दिन (World Digital Detox Day - WDDD) आज जगभर उत्साहात साजरा करण्यात आला. तब्बल ८० देशांमध्ये ही जागतिक डिजिटल वेलनेस चळवळ विविध उपक्रमांनी आयोजित करण्यात आली. या मिशनला महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश शासनाने अधिकृत पाठिंबा दिला असल्याने या चळवळीला राष्ट्रीय स्तरावर मोठे बळ मिळाले आहे. WDDD चा भाग म्हणून पुण्यात आज सकाळी शनिवार वाडा ते शनीपार चौक या मार्गावर भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये अनेक मान्यवर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते: यामध्ये पोलीस उपायुक्त कृषीकेश रावळे, पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त माधव जगताप, 'झेप फाउंडेशन'च्या अध्यक्ष डॉ. रेखा चौधरी , 'स्वान फाउंडेशन' चे अध्यक्ष शशिकांत कांबळे, सचिव प्रसाद भोपळे, सिंहगड फाउंडेशनचे आबा गोळे यांच्यासह अनुराग चॅरिटेबल ट्रस्ट आणि हरीभाई देसाई कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.



### ग्रामीण रुग्णालयात संताजी जगनाडे महाराज जयंतीदिनी अभिवादन

भोकर (स. गांवकरी) : संत परंपरेतील पहिले चरित्रकार व संत तुकाराम महाराजांचे अतिशय निकटवर्तीय शिष्य म्हणून ओळखले जाणारे संताजी जगनाडे महाराज यांची जयंती ग्रामीण रुग्णालय, भोकर येथे श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली. तुकाराम गाथेचे शिल्पकार आणि अजरामर कीर्तीचे तेजस्वी दीपस्तंभ असलेल्या संताजी महाराजांच्या प्रतिमेस दि. ८ डिसेंबर रोजी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमावेळी ग्रामीण रुग्णालय, भोकरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत चव्हाण, आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार, सहाय्यक अधीक्षक संजय देशमुख, प्रल्हाद आप्पा होळगे, औषध निर्माण अधिकारी गंगामोहन शिंदे, अधिपरिचारिका मंगोत्रा संतोषी, ज्योती शेंडगे, छाया बोड्डेवाड आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### दुर्बीणीद्वारे स्त्री कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे २४ डिसेंबर रोजी आयोजन

भोकर (स. गांवकरी) : लोकसंख्या नियंत्रणात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. ग्रामीण रुग्णालय, भोकर येथे दि. २४ डिसेंबर रोजी दुर्बीणीद्वारे (लॅप्रोस्कोपी) स्त्री कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ही माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संदेश जाधव यांनी दिली. प्रसिद्ध लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ. संतोष अंगरवार व सर्जन डॉ. अनंत चव्हाण हे शस्त्रक्रिया करतील. तसेच भुलतज्ञ डॉ. बाळासाहेब बिऱ्हाडे व डॉ. अस्मिता भालके उपस्थित राहणार आहेत. दि. २३ डिसेंबर, मंगळवार रोजी शस्त्रक्रियेस इच्छुक लाभार्थी महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.

## माजी गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव यांना निलंबित करण्याची मागणी

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

पंचायत समिती अहिल्यानगरचे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव यांनी तत्कालिन निंबळक शाळेतील शिक्षक नेते राजेंद्र निमसे यांना निलंबित करण्यासाठी त्यांच्या वर्गाच्या भाषा विषयाच्या उत्तरपत्रिका ह्या २६ ऑक्टोबर २०२४ ला तपासल्या, मात्र त्या उत्तरपत्रिका २५ ऑक्टोबर २०२४ रोजी तपासल्याचे दर्शवून, तपासल्याचा बनावट अहवाल जिल्हा परिषदेस सादर केलेल्या प्रकरणासह त्यांनी पंचायत समिती अहिल्यानगर येथील नस्ती मधून सदर भाषा विषयाच्या उत्तरपत्रिका तपासणी अहवाल स्वतः गायब केला व या बनावट अहवालावरून श्री.निमसे यांचे निलंबन करण्यास कारणीभूत ठरलेल्या श्री जाधव यांना सेवेतून निलंबित करण्याची मागणी रिपाई (गवई) ओबीसी सेलचे शहर जिल्हाध्यक्ष विजय शिरसाठ यांनी केली आहे.

शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांना ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मंत्रालय मुंबई येथे निवेदन देऊन श्री जाधव यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनात म्हटले आहे की तत्कालीन गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव व शिक्षण विस्तार अधिकारी संजय बोबडे यांनी संयुक्तपणे २२ ऑक्टोबर २०२४ रोजी निंबळक शाळेस संकलित मूल्यमापन चाचणी – १च्या निमित्ताने भेट दिली . या भेटीमध्ये श्री जाधव यांनी श्री निमसे वर्गशिक्षक असलेल्या वर्गावरील पर्यवेक्षक यांना सदर चाचणी शासन निर्णयानुसार घेण्यास मज्जाव करण्यात आला .श्री जाधव यांनी चाचणी सोडविताना विद्यार्थ्यांवर दडपण आणले, चाचणी सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ दिला नाही.परिणामी श्री निमसे यांच्या वर्गातील मुलांना भाषा विषयाच्या उत्तरपत्रिका सोडवण्यासाठी शासन निर्णयानुसार मदत न मिळाल्यामुळे या वर्गातील मुलांना उत्तरपत्रिकामधील प्रश्नांचे व्यवस्थित आकलन न झाल्यामुळे मुले गोंधळली.

मात्र त्याच दिवशी निंबळक शाळेतील इतर दहा तुकड्यांच्या वर्गांच्या भाषा विषयाच्या उत्तरपत्रिका ह्या विद्यार्थ्यांकडून शासन निर्णयानुसार सोडवण्यात आल्या .श्री जाधव यांनी श्री निमसे यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांना ही भाषा विषयाची उत्तरपत्रिका सोडविता येऊ नये व त्यांच्या वर्गाची गुणवत्ता ढासळली आहे असे दर्शवून श्री निमसे यांचा असमाधानकारक अहवाल तयार करण्यात यावा म्हणून श्री जाधव यांनी विशेष प्रयत्न केले. श्री निमसे यांना त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका घेऊन जाणेबाबत संशय येऊ नये म्हणून श्री.जाधव यांनी अन्य वर्गांच्या उत्तरपत्रिका अनाधिकाराने ताब्यात घेऊन पंचायत समिती कार्यालयात तपासण्यासाठी नेण्यात आल्या .मात्र श्री जाधव यांनी फक्त श्री निमसे यांच्याच वर्गाच्या भाषा विषयाच्या उत्तरपत्रिका तपासून वरिष्ठांना बनावट अहवाल सादर केला व उर्वरित उत्तरपत्रिका ह्या न तपासता पुनश्च निंबळक शाळेतील वर्गशिक्षकांना तपासण्यासाठी परत देण्यात आल्या.

दरम्यान २५ ऑक्टोबर २०२४ रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी निंबळक शाळेत संयुक्त भेट देऊन श्री निमसे यांच्या वर्गाची तपासणी त्यांच्या अनुपस्थितीत प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी केवळ एकट्यानेच पुढील सत्राच्या अभ्यासक्रमावर केली.

## जागतिक स्पर्धेत इगतपुरीच्या हर्ष व्यास यांचा ऐतिहासिक विजय

**इगतपुरी :** (समर्थ गांवकरी)

जागतिक स्तरावर डिसेंबर २०२५ च्या पार पडलेल्या शक्ती क्रीडा क्षेत्रातील सर्वाधिक प्रतिष्ठेची मानली जाणाऱ्या वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत इगतपुरी शहरातील हर्ष व्यास यांनी ऐतिहासिक विजय मिळवीत पाच पदकांसह भारताचा झेंडा गौरवाने फडकावत देशाचे नाव उज्ज्वल केले. रशियातील मॉस्को येथे डिसेंबर २०२५ – जागतिक स्तरावर शक्ती-क्रीडा क्षेत्रातील सर्वाधिक प्रतिष्ठेची मानली जाणारी वर्ल्ड चॅम्पियनशिप World Championship



2025 स्पर्धा रशियाची राजधानी मॉस्को येथे मोठ्या दिमाखात पार पडली. या भव्य स्पर्धेत ३० देश, ८० राज्य, ४२९ शहरे, तसेच एकूण ३,०३४ आंतरराष्ट्रीय स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

## विद्यापीठ समितीत तज्ञ लोकांच्या सहभाने आनंददायी

**जेष्ठ पत्रकार प्राध्यपक दिलिप वैद्द**

**रावेर :** (समर्थ गांवकरी)

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने नागरिक, शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी केळी निर्यात व्यवस्थापन अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्याच्या समितीत तज्ञ लोकांचा समावेश झाला असल्याने , केळीला सुगिचे दिवस पुन्हा येतिल अशी अपेक्षा आहे. मंगळवारी विद्यापीठात विद्यापीठाचे प्र कुलगुरू प्रा एस टी इंगळे, डॉ अनिल डोंगरे, डॉ सूर्यवंशी, केळी तज्ज्ञ डॉ के बी पाटील, केळी विषयात पीएचडी केलेले ज्येष्ठ पत्रकार डॉ दिलीप तिवारी, जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष डॉ अनिल पाटील, निर्यातदार केळी उत्पादक शेतकरी विशाल अग्रवाल, श्री सुशील नवाल सर, निवृत्त कृषी अधिकारी अनिल भोकरे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वांना बोलण्याची संधी मिळाली. खरं म्हणजे या विषयात आम्हाला अजून खुप काही शिकायचे आहे .

पण या अभ्यासक्रमात आणखी कोणत्या बाबींचा समाविष्ट करता येईल याबाबत आम्ही सोबत नेलेल्या टिपणावरून माझे मनोगत व्यक्त केले. पत्रकार पंकज



पाटील, कोचूर आणि शशांक पाटील, तांदलवाडी यांच्यासह अन्य केळी उत्पादकांनीही या अभ्यासक्रमाबाबत मते मांडली. संपूर्ण महाराष्ट्रात सर्वाधिक केळीचे उत्पादन करत असूनही आपला जळगाव जिल्हा निर्यातीत मात्र मागे आहे. निर्यात वाढ होण्यासाठी अधिकाधिक युवा शेतकऱ्यांनी हा कोर्स करावा या दृष्टीने प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील उत्पादकांना केळी निर्यातीसाठी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन मिळेल अशी अपेक्षा जाणकार शेतकमध्ये व्यक्त केली जात आहे.

## पिंपळगाव माळवी परिसरात खाजगी जमिनीतून मुरुमाची चोरी



**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

पिंपळगाव माळवी (ता. नगर) येथे खाजगी मालकीच्या सर्वे क्र. १५४ मधून गौण खनिज (मुरुम) चे मोठ्या प्रमाणात अनधिकृत आणि बेसुमार उत्खनन करून चोरी केली जात असल्याची गंभीर तक्रार जागामालक बाबासाहेब रामभाऊ शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या प्रकरणात अवैध उत्खनन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करून नुकसानभरपाई देण्याची मागणी त्यांनी केली आहे. बाबासाहेब शिंदे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांच्या सर्वे नं. १५४ या खाजगी जमिनीतून काही अज्ञात व्यक्ती रात्री-अपरात्री येऊन मुरुमाचे उत्खनन करतात व ट्रक-ट्रॅक्टरने चोरी करून नेतात. या प्रकारामुळे शेतजमिनीचे स्वरूप पूर्णपणे बदलले असून उत्खननामुळे मोठमोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे शेती करण्यास अडथळा निर्माण झाला आहे.

अनधिकृत मुरुम उत्खननामुळे शेताची नैसर्गिक सपाटी बिघडली, जमिनीची उत्पादकता घटली आहे. या अवैध उत्खननामुळे महसूल विभागाला व राज्य शासनाला आर्थिक तोटा होत आहे. खाजगी हक्कांचा भंग करुन खाजगी शेत जमीनीत सुरु असलेल्या या प्रकरामुळे मोठी हानी झाल्याचे शिंदे यांनी निवेदनात म्हंटले आहे.

या गंभीर प्रकरणात शिंदे यांनी संबंधित विभाग (महसूल, तहसील, भूगर्भशास्त्र व खनिकर्म विभाग) मार्फत स्थळ पंचनामा करण्यात यावा, अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, भविष्यात हा प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी, शेतजमिनीचे झालेले नुकसान लक्षात घेऊन योग्य नुकसानभरपाई मिळवून देण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

## प्रा. पल्लवी बढे यांना डॉक्टरेट

**जुन्नर तालुका :** (समर्थ गांवकरी)

जयहिंद कॉम्प्रेशन एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचालित जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील सहाय्यक प्रा. पल्लवी बढे यांना सनराइज विद्यापीठ अलवर राजस्थान या ठिकाणा वरून डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.डॉ.पल्लवी यांनी एक्सट्रॅक्शन अँड केमो प्रोफाइ- लिंग इलोफिया हर्बासिया लिंड ट्यबर्स फॉर अँटी कॅन्सर ऍक्टिव्हिटी हा त्यांचा संशोधना चा विषय होता. डॉ.पल्लवी यांनी तीन आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये आपले शोध निबंध सादर केले तसेच दोन आंतरराष्ट्रीय रिसर्च पेपर प्रकाशित केले अशीमाहिती



जयहिंद संकुलाचे सीईओ डॉ. डी. एस. गल्हे यांनी दिली. महाविद्यालयातील सर्व शिक्षक वर्ग उच्चशिक्षित आहेत आणि या सकारात्मक गोष्टीचा विद्यार्थ्यांना नेहमीच फायदा होतो. महाविद्यालय शिक्षकांना उच्च शिक्षणासाठी कायम प्रयत्नशील असते कारण शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण बौद्धिक विकास अवलंबून असतो असे मत प्राचार्य डॉ.तेजस पाचपुते यांनी व्यक्त केले.

## माळेगाव यात्रेत होण्याच्या सूक्ष्म नियोजन करा : जिल्हाधिकारी कर्डिले

**नांदेड जिल्हा :** (समर्थ गांवकरी)

दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या लोहा तालुक्यातील श्री खंडोबा देवस्थान, माळेगाव येथील यात्रा दिनांक 18 ते 24 डिसेंबर 2025 या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून यात्रेत सर्व सुविधा उपलब्ध राहतील, यासाठी संबंधित सर्व विभागांनी सुक्ष्म नियोजन करून समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज झालेल्या पूर्व तयारी आढावा बैठकीत ते बोलत होते.



यात्रेच्या पहिल्या दिवशी म्हणजे 18 डिसेंबर रोजी देवस्वारी व पालखी पूजन होईल व दुसऱ्या दिवशी पशुप्रदर्शन व दुग्धस्पर्धा यांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात्रेच्या कालावधीत भाविकांसाठी आवश्यक सर्व सुविधा प्रशासनाच्यावतीने उपलब्ध करण्यात येणार आहेत. यात्रेच्या सोयीसुविधांबाबत पशुसंवर्धन, कृषी, पोलीस प्रशासन, बीएसएनएल, महावितरण, परिवहन, आरोग्य विभाग आदींच्या कामांचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतला.

या बैठकीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अपर जिल्हाधिकारी रत्नदिप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गिरी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रविणकुमार घुले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत , माळेगावचे सरपंच प्रतिनिधी हणमंत धुळगंडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आदीची उपस्थिती होती. यात्रेत भाविकांना शासनाच्या योजनांची माहिती मिळावी म्हणून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना, महाविस्तार ॲप, ॲग्रीस्टॅक, आयुष्यमान भारत, महिला व बाल विकास विभाग,पशूसंवर्धन विभाग यांचे स्टॉल उभारण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना दिल्या.

तसेच भाविकांना इंटरनेट सेवा अखंडित मिळावी यासाठी बीएसएनएलने वायफाय व नेटवर्क व्यवस्थेचे विशेष नियोजन करावे, अशाही सूचना देण्यात आल्या.

यात्रेच्या काळात पुढीलप्रमाणे सुविधा उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिली. यात सीसीटीव्ही, वॉशरूम, बॅरिकेट व्यवस्था, मंदिराकडे जाणाऱ्या बायपास रस्त्याची दुरुस्ती, हेलिपॅड, स्वच्छतेसाठी मोबाईल व्हॅन, विविध स्पर्धा व पशुप्रदर्शनासाठी लागणारा निधी याबाबतची माहिती त्यांनी दिली. यावेळी विविध विभागांना यात्रेच्या अनुषंगाने करण्यात आलेले नियोजनाची माहिती यावेळी दिली. यात्रा परिसरातील कला महोत्सव, मंदिर परिसर, कुस्ती मैदान, कृषी व पशुप्रदर्शन विभाग, बसस्टॅण्ड येथे चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची व नियोजनाची माहिती अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)


# बिबट्यांचा धोका वाढला : आ. काशिनाथ दाते

■ तातडीची कार्यवाही न केल्यास परिस्थिती बिकट!

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

राज्यात मागील काही महिन्यांपासून बिबट्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून ग्रामीण तसेच शहराजवळील वस्त्यांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नोव्हेंबर २०२५ मधील घटनांनी तर प्रशासनासमोर धोक्याची मोठी घंटा वाजवली असून याच पार्श्वभूमीवर पारनेर-नगर विधानसभा मतदार संघाचे आमदार काशिनाथ दाते सर व अन्य सदस्यांनी राज्याच्या वनमंत्र्यांचे लक्ष तातडीच्या आणि सार्वजनिक हिताच्या या गंभीर मुद्द्याकडे वेधले आहे.

त्यांनी सांगितले की, राज्याच्या विविध भागांत बिबट्यांनी मानवी वस्तीत प्रवेश करण्याच्या



घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये पारनेर तालुक्यातील कळस येथे एका तरुणाचा, तर पारनेर शहरात तीन वर्षीय बालिकेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील खारेकर्जुने येथे पाच वर्षांच्या मुलीचा मृत्यु, तसेच जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यात तब्बल २० जणांचा बिबट्या आणि वाघांच्या हल्ल्यात बळी गेल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे.

गोंदिया जिल्ह्यातील तिरोड्यात वडिलांसोबत शेतात गेलेल्या बालिकेचा बिबट्याने बळी घेतला तर चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यात चिचपल्ली वनपरिक्षेत्रात गुराख्याचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. पुणे जिल्ह्यातील पिंपरखेड येथे १३ वर्षीय मुलाचा २ नोव्हेंबर २०२५ रोजी बिबट्याने बळी घेतला. यापूर्वीच एका पाच वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

पुढे बोलताना आमदार काशिनाथ दाते यांनी म्हटले आहे की, राज्यात बिबट्यांची संख्या पाच हजारांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज व्यक्त होत असताना वनविभागाच्या सर्व्हेनुसार जंगलांमध्ये २,२८५ बिबटे असल्याचे समोर आले आहे. मात्र जंगलाबाहेर द्राक्ष, ऊस आणि कापसाच्या शेतीत मोठ्या प्रमाणात बिबट्यांची पैदास होऊन याठिकाणचे सर्वेक्षणच न झाल्याची माहिती धक्कादायक आहे. फक्त जुन्नर वनपरिक्षेत्रातच तब्बल दोन हजार बिबटे असल्याचे दिसून येत आहे, तर राज्यात इतकी मोठी संख्या असताना फक्त पाच बिबट्यांच्या नसबंदीला परवानगी दिली गेल्याची बाब गंभीर आहे.

मागील तीन वर्षात बिबट्या आणि वाघांच्या हल्ल्यांत २५० हून अधिक नागरिक आणि सुमारे १७ हजार पाळीव प्राणी बळी पडले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असुरक्षितता निर्माण झाली असून आर्थिक नुकसानही मोठ्या प्रमाणात होत आहे. बिबट्यांची संख्या अनियंत्रितपणे वाढत असताना वनअधिकारी व रक्षकांची हजारो पदे रिक्त आहेत, ज्यामुळे नियंत्रणाची

> सरकारने वेळ न दवडता बिबट्या-वाघांच्या वाढत्या धोक्याला रोखण्यासाठी ठोस नियोजन, मानवी वस्त्यांचे संरक्षण, वनरक्षकांची तातडीने भरती आणि वैज्ञानिक पद्धतीने वन्यजीव व्यवस्थापनाची अंमलबजावणी करावी, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी यांनी २७ नोव्हेंबर रोजी केलेल्या निवेदनानंतरही कार्यवाहीत दिरंगाई होत आहे.
> **- आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

क्षमता कमी झाली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते सरांनी वनमंत्र्यांचे लक्ष वेधताना स्पष्ट केले की, राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून उच्चस्तरीय चौकशीसह प्रभावी उपाययोजना लागू कराव्यात.

# कंपोस्ट कल्चरचे वाटप करीत मृदा दिन साजरा




**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

मांदारणे व ओतूर ता:- जुन्नर येथे ६० पशुपालक शेतकऱ्यांना कंपोस्ट कल्चरचे मोफत वाटप करून बीडीटी सोशल इम्पॅक्ट फाउंडेशन व चाईल्ड फंड इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी दि:-५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिनानिमित्त हा वाटप कार्यक्रम राबविण्यात आला.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना शेणखत,ऊसाचे पाचट व सेंद्रिय घटकांचे विघटन कार्य कशा पद्धतीने केले जाते व कल्चरचा वापर कसा केला जातो आणि त्याचे जमिनीसाठी होणारे फायदे याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या खताचा लाभ ओतूर,मांदारणे व परिसरातील शेतकऱ्यांनी घेतला.वाटपप्रसंगी बीडीटी फाउंडेशनचे अक्षय तांबे व शेतकरी व पशु पालक विश्वास महाकाळ,किसन महाकाळ,संदीप महाकाळ, शांताराम महाकाळ,योगेश अहिनवे,मच्छिंद्र महाकाळ, संपत महाकाळ,राहुल महाकाळ दत्तात्रेय महाकाळ, राहुल भोर,भगवान महाकाळ,ज्ञानेश्वर महाकाळ,संकेत महाकाळ,नीलेश नलावडे,सुरेश ठोसर,तुषार महाकाळ, शरद ढमाले,प्रभाकर महाकाळ व चाइल्ड फंड इंडिया संस्थेचे समूह संघटक मंगेश अतकर,दीपाली जगताप व इतर शेतकरी उपस्थित होते.

# शिवनेरीची जिजाऊ स्पर्धा २०२५ मध्ये सायली व कु. गार्गी रोकडे यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुका मेडिकल असोसिएशन आयोजीत शिवनेरी ची जीजाऊ स्पर्धा २०२५(आईचे आपल्या मुलांवर होणारे संस्कार) आदिवासी सांस्कृतीक भवन जुन्नर येथे रविवार दि.७ डिसेंबर रोजी संपन्न झाली.या मध्ये सौ.सायली व कु.गार्गी गणेश रोकडे यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाळे. दोघींचेही मनः पूर्वक अभिनंदन. या स्पर्धेमध्ये एकूण २५ मायलेक, मायलेकीं च्या जोड्या सहभागी झाल्या होत्या.सर्व स्पर्धकांना आयोजकांतर्फे प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देण्यात आल्या. सौ. सायली गणेश रोकडे व कु.गार्गी गणेश रोकडे या मायलेकीच्या जोडीने त्यांच्या नृत्य अविष्कारा तून लहान मुलींवर होणाऱ्या अत्याचारावर भाष्य करणारे सादरीकरण करत,समाजामध्ये




याविषयी जनजागृती निर्माण करणारा संदेश दिला. याप्रसंगी या मायलेकींना जुन्नर तालुका मेडिकल असोसिए शनचे अध्यक्ष डॉ.शिंगोटे व मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, रुपए पाच हजार पाचशे पंचावन्न व प्रशस्तीपत्र असे प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले.या कार्यक्रमा प्रसंगी जुन्नर तालुका मेडिकल असोसिएशनचे डॉ.प्रदिप जोशी,डॉ.सचिन डुंबरे, डॉ. गणेश इंगवले,डॉ.सागर शिंदे,डॉ.देशपांडे त्याचप्रमाणे असोशीएशनचे सर्व सभासद डॉक्टर्स व जुन्नर तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर व स्पर्धक उपस्थित होते.

# विजेचा धक्का लागून मृत्यू

**किनवटः (समर्थ गांवकरी)**

प्रतिनिधी किनवट तालुक्यातील बोधडी बु येथील एका ३० वर्षीय युवकाचा शेतामध्ये काम करत असताना AG लाईनच्या विद्युत प्रवाहाचा तीव्र झटका लागून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. पोलीस स्टेशन किनवट येथे या प्रकरणी अकस्मात मृत्यू (आ.मृ.) क्रमांक ४७/ २०२५, कलम १९४ BNNS २०२३ अंतर्गत नोंद करण्यात आली आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ८ रोजी दुपारी सुमारे ३.४५ वाजता कागणे यांच्या मौजे शनिवारपेठ परिसरातील शेतशिवारात, नरेश नारायण कतुलवार (वय ३०), रा. बोधडी बु, ता. किनवट हा शेतातील नियमित कामासाठी गेल्यानंतर अनाहूतपणे AG वीज लाईनच्या विद्युत प्रवाहाचा जोरदार धक्का बसल्याने त्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

# अनधिकृत पाणी उपसा बंद करण्यासाठी वाफगाव ग्रामस्थांकडून पाटबंधारे विभागात धरणे आंदोलन

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

वाफगाव ता.खेड परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी वरदान असलेल्या लघू पाटबंधारे तलावातून मोठया प्रमाणात बेकायदा पाणी उपसा सुरू आहे. अधीक्षक अभियंता यांनी अनधिकृत पाणी उपसा बंद करण्याचा आदेश दिला असताना चासकमान पाटबंधारे विभागाकडून कारवाई होत नसल्याने बुधवारी (दि.१०) चासकमान विभागीय कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले.

वाफगाव परिसरातील शेतीसाठी वरदान असलेल्या या धरणामुळे येथील शेतकऱ्यांचा शेतीच्या पाण्याचा प्रश्न संपुष्टात येऊन जवळपास ३१२ हेक्टर क्षेत्र बागायत खाली येणे अपेक्षित



झाले होते.परंतु खेड पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षामुळे धरणातून मोठया प्रमाणात अनधिकृत पाणी उपसा होत असल्याने कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. या तलावातील अनधिकृत पाणी उपसा बंद व्हावा यासाठी मुक्ताई देवी पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष शिवाजी सुर्वे व माजी उपसरपंच अजय भागवत यांनी पत्रव्यवहार केला होता. परंतु, संबंधित विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे अनधिकृत पाणी उपसा होत राहिल्याने उन्हाळ्यात तलावात पाणी शिल्लक राहत नाही ,परिणामी वाफगाव परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण होते यावेळी धरणे आंदोलन वेळी पाणी वाटप संस्थेचे संचालक तसेच . वाफगावचे माजी उपसरपंच अजय भागवत ,माजी पंचायत समिती सदस्य सुभाष थिटे ,माजी सरपंच शरद थिटे ,ग्रामपंचायत सदस्य अमोल कराळे ,सोसायटीचे संचालक भरत थिटे ,माजी संचालक रज्जाक इनामदार ,माजी उपसरपंच विकास कराळे ,मोहन मांदळे ,खंडू शिंदे ,काळूराम मांदळे ,कैलास कराळे ,नंदू चिखले ,शांताराम रामाणे ,श्रीरंग सुर्वे,संपत कराळे,अमित लंगोट ,अंकुश कानपिळे ,सचिन कालेकर व शेतकरी उपस्थित होते.

. या बाबत सहाय्यक अभियंता संतोष शिंदे यांनी 15 डिसेंबरला अनधिकृत मोटरीवर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. या कारवाईत महावितरण विभाग व पोलीस कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

# १२ व १३ डिसेंबरला तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद पुणे,पंचायत समिती जुन्नर (शिक्षण विभाग) व समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट चे समर्थ जुनिअर कॉलेज बेल्हे आणि जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघ यांचे संयुक्त विद्यमाने तालुका स्तरीय विज्ञान मेळावा व प्रदर्शन २०२५-२६ समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे १२ व १३ डिसेंबर २०२५ दरम्यान घेण्यात येणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे यांनी दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा.प्रवीण ताजने,सचिव प्रकाश जोंधळे सर,कार्यकारिणी सदस्य,मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तबाजी वागदरे,सचिव अशोक काकडे,सर्व विभागाचे केंद्रप्रमुख ,मुख्याध्यापक,विज्ञान व गणित



शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थित मुख्याध्यापक,शिक्षकांना मार्गदर्शन करताना गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे म्हणाले की,या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला,अंगभूत कौशल्यांना वाव मिळतो म्हणून यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी कसे सहभागी होतील यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा. तसेच वाचन,लेखन,गणिती क्रिया व स्पर्धात्मक परीक्षा यासाठी आजचा विद्यार्थी सक्षम व्हावा हा यामागील मुख्य हेतू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नवनिर्मितीची संधी याच वयात विद्यार्थ्यांनी आत्मसात करून प्रगती साधावी.या प्रदर्शनाला मेळाव्याचे स्वरूप देऊन प्रगत तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी.छोट्या छोट्या प्रतिकृतीतून आनंद घेऊन एक वातावरण निर्मिती होण्यासाठी हे विज्ञान प्रदर्शन महत्वाचे आहे.

विज्ञान प्रदर्शन हे केवळ प्रदर्शन न राहता तो एक विज्ञान मेळावा व्हावा यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोत. प्रदर्शनामध्ये आयुकामार्फत-अवकाश दर्शन व विज्ञान खेळणी मांडणी,दुर्मिळ शस्त्रास्त्रे व नाणी प्रदर्शन तसेच प्रकल्प स्पर्धेबरोबरच संगणकीय सादरीकरण स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा,विज्ञान प्रश्नमंजुषा, कौन बनेगा विज्ञानपती,पोस्टर सादरीकरण स्पर्धा तसेच चला प्रयोग करूया,हस्तकलेतील विज्ञान,आयडिया बॉक्स कॉम्पिटिशन आणि यांचबरोबरनामवंत शास्त्रज्ञ,संशोधक,वक्ते यांची व्याख्याने,गणिती व विज्ञान खेळण्याचे स्वतंत्र दालन,अंधश्रद्धा निर्मूलनपर जादूचे प्रयोग,विद्यार्थी उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन आदी उपक्रमाचा तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधन वृत्ती जोपासण्यासाठी वेगवेगळ्या विज्ञानपूरक उपक्रमांचा या प्रदर्शनात समावेश केला जाणार असल्याचे संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी सांगितले. या मेळाव्यात आपत्ती व्यवस्थापन कक्ष तयार करणार असून त्याद्वारे मार्गदर्शन देण्यात येईल.

सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभागाबाबतचे प्रमाणपत्र देणार असल्याचे विज्ञान व गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण ताजणे यांनी सांगितले.

# आंतरशालेय बालनाट्य स्पर्धा महोत्सव

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद शिक्षण विभाग व पुणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण आंतरशालेय बालनाट्य स्पर्धांना गुरुवार(ता. ११) पासून सुरु होत आहेत अशी माहिती नाट्यस्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष हनुमंत कुबडे यांनी दिली.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी व बालकलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने गेली ५४ वर्षे या बालनाट्य स्पर्धेचे आयोजन करते. या स्पर्धांमधून डॉ. अमोल कोल्हे, राहूल सोलापूरकर यासारखे अनेक कलावंतांनी नाट्यकलेचा श्री गणेशा केला आहे. यावर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर व संजय नाईकडे तसेच 'डायट' चे प्राचार्य डॉ.नामदेव शेंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धांचे आयोजन केले आहे.

# वीस गुंठे क्षेत्रातुन समृद्धी काकडीचे भरघोस उत्पन्न

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील एका छोट्याश्या जारकरवाडी गावातील सचिन भोजने या शेतकऱ्याने अर्धा एकरात क्षेत्रात नेत्रा कंपनीच्या समृद्धी नावाच्या काकडी वाणाची लागवड केल्याने भरघोस असे उत्पन्न मिळाले आहे. तालुकाभर चालू असलेल्या परतीचा पावसामुळे अनेक ठिकाणी शेतमालांचे नुकसान झाले. यामुळे शेतकरी भयभीत झाले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत कोणते पीक घ्यावे, कोणते नाही याकरता शेतकरी चिंतीत असायचा.आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडीतील शेतकरी सचिन भोजने यांनी वीस गुंठे क्षेत्रात नेत्रा समृद्धी काकडीची लागवड केली.

सुमारे ३० ते ४० दिवसापासून त्यांच्या काकडीची बाजारात विक्री सुरू असून या कालावधीत त्यांना उत्तम असा मोबदला मिळालेला आहे. काकडी फळाचा रंग सफेद



असल्याने बाजारपेठेत मोठया प्रमाणात मागणी होत आहे. रोग प्रतिकार शक्ती देखील चांगली असल्याने रोगाला कमी बळी पडते.

आपल्या शेतात काकडीला योग्य प्रमाणात भाव मिळाल्याने शेतकरी समाधानी आहे. तसेच त्यांच्या शेतीसाठी बियाणे खरेदी पासून ते विक्री पर्यंत संपूर्ण मार्गदर्शन नेत्रा सीड्स कंपनीचे प्रतिनिधी राहुल बढे यांनी केले तसेच मंचर येथील महेश कृषी सेवा केंद्र च्या पुजा भोर यांनी देखील मोलाचे सहकार्य केले.

# नवीमुंबई विमानतळ नामांतरासाठी जनआक्रोश

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

■ लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाला सन्मान द्या.

लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे, या जनभावनेच्या निर्णायक मागणीसाठी २२ डिसेंबर रोजी खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भव्य जनआक्रोश दिंडी मोर्चा काढण्यात येणार आहे. याच आंदोलनाच्या तयारीचा एक भाग म्हणून दिवा आगासनगाव येथे ग्रामस्थांच्या वतीने विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीनंतर गावात भव्य रॅली काढून जनजागृती करण्यात आली. प्रसंगी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला विशेषतः महिलांची मोठ्या प्रमाणातील उपस्थिती ही आंदोलनाचा स्वर बदलणारी ठरली. महिलांनी हातात घोषवाक्यांच्या पाट्या घेत प्रशासनाकडे एकच मागणी केली की "विमानतळाला आमच्या लोकनेत्याचे नाव द्या!"



# तेजस्विनी उगले टाकळी ढोकेश्वर गटाच्या नवीन सक्षम महिला नेतृत्व

■ माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके यांचे प्रतिपादन

■ टाकळी ढोकेश्वर येथे बांधकाम कामगारांसाठी विशेष कॅम्प व मेळावा संपन्न

■ कॅम्प व कामगार मेळाव्याच्या माध्यमातून अमोल उगले यांनी फुंकले जिल्हा परिषद निवडणुकीचे रणशिंग

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

बांधकाम कामगार हे समाजाच्या विकासाचे खरे शिल्पकार आहेत. मात्र त्यांना अनेकदा त्यांच्या हक्काच्या योजनांचा लाभ मिळत नाही.




तेजस्विनी अमोल उगले यांनी हा उपक्रम राबवून कामगारांना न्याय देण्याचे मोठे काम केले आहे. टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटामध्ये तेजस्विनी उगले यांच्या माध्यमातून नवीन सक्षम महिला नेतृत्व पुढे येत आहे. त्यांचे समाजासाठी सुरू असलेले कार्य असेच सुरू राहावे. निलेश लंके साहेबांच्या मार्गदर्शनाखाली असे उपक्रम ग्रामीण भागात सातत्याने राबवले जावेत, हीच अपेक्षा आहे. असे मत जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई निलेश लंके यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषद गट नेते तथा निलेश लंके युवक प्रतिष्ठानचे सचिव अमोल उगले, तेजस्विनी अमोल उगले यांच्या पुढाकारातून टाकळी ढोकेश्वर येथील वृंदावन लॉन्समध्ये बांधकाम कामगारांसाठी विशेष कॅम्प व कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

कार्यक्रमाला युवा नेते निलेश लंके युवक प्रतिष्ठानचे सचिव अमोल उगले, तेजस्विनी अमोल उगले, टाकळी ढोकेश्वर सरपंच अरुणा खिलारी, उपसरपंच रामभाऊ तराळ, पळशीचे सरपंच प्रकाश राठोड, जेष्ठ नेते भागूजी झावरे, सामाजिक कार्यकर्ते मोहनराव रोकडे, तिखोलचे माजी सरपंच संदीप ठाणगे, लखन ठाणगे, दत्तात्रय निवडुंगे, सामाजिक कार्यकर्त्या अक्षदा गागरे, अर्चना पानसरे, शीतल वाडेकर यांच्यासह सुमित औटी, सुयोग दाते, चंद्रकांत खेमनर, विशाल गागरे, सौरभ क्षीरसागर, आदित्य शिर्के, प्रतीक्षा आंधळे, स्वाती आंधळे, आशाताई ठाणगे, अश्विनी गाडगे, योगेश तोडकर, मंगेश सोनूळे, अमोल आल्हाट, नितीन गुंड, सुरेश टेकूडे, विठ्ठल दरेकर आदी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विशेष कॅम्पमध्ये बांधकाम कामगारांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. आधार कार्ड, बँक खाते जोडणी, नोंदणी, नूतनीकरण आदी सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. शेकडो कामगारांनी या कॅम्पचा लाभ घेताना दिसले.

या मेळाव्याला परिसरातील कामगारांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून, अमोल उगले व तेजस्विनी उगले दांपत्याच्या जनसेवेची सर्वत्र स्तुती होत आहे.

> सर्वसामान्य जनतेपर्यंत शासकीय योजना पोहोचल्या पाहिजे हा हेतू समोर ठेवून समाजात कष्ट करणाऱ्या वर्गासाठी बांधकाम कामगार योजना शिबिर राबवून व या योजनेचा लाभ पोहोचविण्याचे काम केले आहे खासदार निलेश लंके यांच्या सामाजिक कामाला आदर्श मानून या पुढील काळात टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात काम करणार आहे.
> **- तेजस्विनी उगले (टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गट)**

# या विचित्र घुसमटीचं काय करावं?

फलटण येथील डॉक्टरांच्या बाबतीत मंगळवारी दोन वेगवेगळ्या घटना घडल्या. दोन्हींमध्ये प्रचंड विरोधाभास आहे हे खरं, पण दोन्हीतला योगायोग एका गंभीर प्रश्नाकडे बोट दाखवणारा आहे. तिकडे नागपूरला सुरू असलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस फलटण येथे झालेल्या महिला डॉक्टरच्या आत्महत्याप्रकरणी अनेक गौप्यस्फोट करत होते. पीडित डॉक्टरच्या आत्महत्येला फौजदार बदने अन् बनकर कसे जबाबदार होते, हे ते वेगवेगळ्या पुराव्यानिशी स्पष्ट करत होते. विशेष म्हणजे फौजदार बदने पीडितेला लग्नाचं आमिष दाखवून अत्याचार करत होता, याची चर्चा सभागृहात रंगली होती. त्याचवेळी इकडे फलटण उपजिल्हा रुग्णालयात एका सरकारी डॉक्टरांवर रुग्णांच्या नातेवाइकांनी हल्ला चढविला होता. एकाच दिवशी 'डॉक्टरांवर अत्याचार' अन् 'डॉक्टरांवर हल्ला' अशा दोन घटनांची चर्चा सोशल मीडियावर व्हायरल झाली होती.

पीडितेच्या आत्महत्या प्रकरणाची चौकशी एखाद्या निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखेखाली व्हावी, अशी मागणी करण्यासाठी विरोधकांनी जोरदार तयारी करून ठेवली होती; परंतु अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी 'न्यायालयीन चौकशी सुरू झाली आहे', अशी घोषणा करून मुख्यमंत्र्यांनी विरोधकांच्या 'तोफगोळ्यातला बारूद' अलगदपणे बाजूला काढून ठेवला. पीडितेच्या मृत्यूचा विषय केवळ तिच्या व्यक्तिगत आयुष्याशीच संबंधित आहे, हे वारंवार स्पष्ट करून सरकारनं या प्रकरणातली 'राजकीय हवा' काढण्याचा प्रयत्नही केलाच. मात्र, बोलता-बोलता शेवटी फडणवीसांनी 'मृत तरुणीवर दबाव आणून अनफिट प्रमाणपत्र मिळवून घेतले जात होते', हेही जाहीर केले. खरे तर याच मुद्द्यावर विरोधकांनी गेले दीड महिने गदारोळ माजविलेला होता. आपल्या दोन 'पीएं'च्या मोबाइलवरून डॉक्टर तरुणीवर 'अनफिट सर्टिफिकेट' साठी दबाव आणू पाहणाऱ्या माजी खासदारांना सातत्याने 'लक्ष्य' केलं जात होतं. या (आत्म)हत्या प्रकरणाने राज्यभरात उठलेली संतापाची लाट कालोघात तशी विरून गेली असली, तरी राजकीय दबावाखाली काम करता-करता कडेलोट होऊन बळी गेलेल्या जिवाबाबतची सहानुभूती आणि संताप कायम असणं स्वाभाविक आणि अपेक्षितही! मात्र, पोलिसांनी दाखल केलेल्या 'एफआयआर' मध्ये अद्यापतरी या राजकीय दहशतीचा एका ओळीनेही उल्लेखच आला नाही. ती केवळ वैयक्तिक आयुष्यात अपेक्षाभंगाच्या वेदनेने तडफडत नव्हती, तर राजकीय झुंडशाहीच्या दबावतंत्रामुळेही सहा महिन्यांपासून अस्वस्थ होती. याचा तपास कदाचित एसआयटीने केला असला, तरीही न्यायालयासमोर उभ्या राहणाऱ्या खटल्यात हा मुद्दा कधी कागदावर येणार, हा कळीचा मुद्दा.

फलटण प्रकरणाचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्याची वेळ जवळ येत चालली आहे. पुरवणी जबाबात राजकीय हस्तक्षेपाचा उल्लेख करू, असं संबंधित तपास अधिकाऱ्यांनी सांगितल्याचं तिचे नातेवाईक म्हणतात, मात्र अद्यापपावेतो अशा पुरवणी जबाबाला मुहूर्तच लागलेला नाही.



## संपादकीय



## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ५७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | 3 | 4 | 6 | | | | |
| 4 | 7 | | | | 5 | 1 | | 9 |
| 5 | | | | | 3 | | 6 | 8 |
| | | | 2 | | 9 | 7 | | |
| 7 | | | 3 | | 8 | | | 4 |
| | | 2 | 7 | | 6 | | | |
| 1 | 9 | | 5 | | | | | 6 |
| 6 | | 5 | 1 | | | | 8 | 2 |
| | | | | 9 | 4 | 5 | 1 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ५६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 4 | 5 | 3 | 2 | 1 | 7 | 6 |
| 6 | 5 | 1 | 7 | 4 | 9 | 2 | 3 | 8 |
| 2 | 3 | 7 | 8 | 1 | 6 | 4 | 9 | 5 |
| 3 | 6 | 9 | 2 | 8 | 4 | 5 | 1 | 7 |
| 5 | 1 | 2 | 9 | 7 | 3 | 8 | 6 | 4 |
| 4 | 7 | 8 | 6 | 5 | 1 | 3 | 2 | 9 |
| 9 | 2 | 5 | 3 | 6 | 8 | 7 | 4 | 1 |
| 7 | 4 | 3 | 1 | 9 | 5 | 6 | 8 | 2 |
| 1 | 8 | 6 | 4 | 2 | 7 | 9 | 5 | 3 |

गुरूवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान

मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:सप्तमी १३:५७:२०
नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी
२७:५५:२३+

योग:विष्कुम्भ
११:३९:३८
करण:बव १३:५७:२०
करण:बालव
२६:२१:२७+
सूर्य:वृश्चिक

## उपदेशाचे डोस

### इच्छाशक्तीच्या बळावर जगही जिंकता येते

केवळ सव्वा वर्षांची असताना मेंदुज्वरामुळे दृष्टी आणि ऐकण्याची क्षमता गमावलेली एक मुलगी आज जगविख्यात लेखिका म्हणून नावारूपाला आली आहे. तुम्हाला हा चमत्कार वाटत असेल तर, त्याची जनकही हीच मुलगी आहे. हेलेन केलर असे या मुलीचे नाव. आपल्या केवळ इच्छाशक्तीच्या बळावर तिने आपल्या कठीण मानल्या जाणाऱ्या आजारालाही नियंत्रित केले. ज्या वयात तिचे खेळायचे-बागडायचे दिवस होते, त्या वयात तिच्या पुढ्यात केवळ अंधार होता. आजारामुळे तिला सुरुवातीला नैराश्य आले होते. तिच्या पालकांनी मग तिची जबाबदारी एनी सुलियन यांच्याकडे सोपवली. अगदी ब्लॅक चित्रपटात अमिताभ ज्या पद्धतीने राणी मुखर्जीला स्पर्शाची भाषा शिकवतो. अगदी त्याच पद्धतीने एनीने हेलेनला स्पर्शाची भाषा शिकवली.

यानंतर एनीने तिला भाषा शिकवण्यासाठी जिवाचे रान केले. तिला प्रथम हाताने भाषा शिकवत शब्दांचे अर्थ तिला समजावले. यानंतर हेलरच्या मनात नवीन उमेद जागी झाली. हेलरने यानंतर कधीही मागे वळून पाहायचेच नाही हे ठाम केले.

तिच्यात एक अशी ऊर्जा निर्माण झाली, की या ऊर्जेने तिला नवीन दृष्टी दिली, आणि ही ऊर्जा होती तिच्या इच्छा शक्तीची. या बळाच्या आधारेच तिने रेडक्लिफ महाविद्यालयातून आपली पदवी मिळवली. या दरम्यान हेलेनचे पहिले पुस्तक 'द स्टोरी ऑफ लाईफ' प्रकाशित झाले. यानंतर याचे जवळपास ५० भाषांमध्ये या पुस्तकाचे भाषांतर करण्यात आले.

इथे हेलन यांच्या केवळ इच्छाशक्तीचाच विजय झाला. त्यांनी बालपणातच जर हार मानली असती तर जगाला इतकी प्रतिभाशाली लेखिका मिळालीच नसती. म्हणूनच केवळ इच्छाशक्तीच्या बळावरच आपण विजय मिळवू शकतो हे विसरता कामा नये.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९४१- जर्मनी आणि इटली यांनी अमिरेकेविरुद्ध युद्धाची घोषणी केली.
- १९५३- केटीव्हीए टीव्ही चॅनल ११ अलासकाचा पहिला टीव्ही स्टेशन बनला.
- १९६०- काळा रविवार- अलजेरियामध्ये ११४ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९६७- पश्चिम भारतात भूकंपात १७० मृत्यूमुखी.
- २००६- भारत-पाक सीमेवर ऑपरेशन सर्द हवा सुरु
- २००७ - भारताने पाकिस्तानविरुद्ध बंगळुरुत तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या डावात सर्वाधिक अवांतर धावा देण्याचा नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. भारतों ७६ अवांतर धावा देत ७१ अवांतर धावा देण्याचा वेस्टइंडीजचा १९८८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध जॉर्जटाउनमध्ये बनवलेला विक्रम मोडीत काढला.


### जन्म

- १४७५- लिओ एक्स इटलीचे पोप यांचा जन्म.
- १९१३- फ्रान्सीसी अभिनेता जीन मेरियस यांचा जन्म.
- १९२२- युसुफखान दिलीप कुमार या नटाचा जन्म.
- १९२९- भारतीय फिरकी गोलंदाज एस.पी. गुप्ते यांचा जन्म.

### निधन

- १७१८- स्वीडनचे राजा चार्ल्स तृतीय यांचे निधन.
- १९०३- क्रिकेटपटू आणि पंच पॅटरीक मॅकशेन यांचे निधन.
- १९७२- न्यूझीलंडचा क्रिकेटपटू जॉन मील्स यांचे निधन.
- १९७९- अमेरिकी अभिनेत्री क्लेअर कार्लटोन यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ५७



**आडवे शब्द**

१. कोडगा
४. आखडून जाणे
६. जन्म-मृत्यू
१०. चिंतन
११. पुन्हा
१२. साजूक तूप असे हवे
१४. एखादे काम पूर्ण करण्याचे पक्के ठरवणे
१५. सहाय्य, १७. चर्चा
१९. शिक्षक, २१. शरीर
२२. पराजय
२४. व्यायाम. ताणलेल्या दोरीवरचा खेळ
२५. संगीतातील ठेका
२६. शब्दाचे वजन
२७. पंख
२९. एकमेकांपुढे
३२. सुंदर तरुणी
३३. गायीगुरांचा पावलाचा भाग
३४. अखंड
३५. अवघड काम
३६. शिक्षा
३७. ज्याला संध्याकाळनंतर दिसत नाही असा
३९. स्तुती करणारा
४१. संन्यासाचे निवासस्थान
४३. उपवन, उद्यान
४५. रक्षण करणारा
४६. ओढा, आवड
४७. हादरा देणारी
४९. बारीकसारीक
५०. दिवस, ५१. फुलाची माळ
५२. मांजर (सं.)
५३. चंद्राची कड
५६. मालक
५७. पुष्कळ
५८. गुरांचा समुदाय
५९. लपाछपीचा खेळ
६१. पुत्र, मुलगा
६३. कापडचोपड
६४. सिंह
६५. उणीव

**उभे शब्द**

२. तमाशातील ठसकेबाज गीत
३. मीठ
४. लोकांचे विचार
५. बेडकांचे ओरडणे
६. सांभाळणे
७. पुरुष
८. मान खाली घातलेला
९. मजेत रेगाळत, --- गमत
१२. कलावंत
१३. किंमत, मूल्य
१६. दार
१८. हावरटपणा
२०. रात्रभर
२३. प्रवास, भटकणे
२५. चांदणी
२७. अनुमती, मान्यता
२८. श्रीविष्णूचे एक नाव
२९. मनाला टोचणारे दु:ख
३०. सुगंधी पांढरे फूल
३१. रिकामा
३३. बुटका, माठाचा प्रकार
३४. विचारांची देवाणघेवाण
३५. सारखा, ३६. फुटकळ
३८. मस्तकाखालचे शरीर
४०. गडीमाणसे
४२. पाकाचा 'कडक' प्रकार
४३. निरर्थक कडबड
४४. पांढरपेशा, ४६. सोनचाफा
४६अ. रोगप्रतिबंधक द्रव
४७. मेंढपाळ
४८. बरणीच्या तोंडावर बांधण्याचे फडके
५४. कडी अडकवण्याचा आकडा
५५. पराभव, ५६. मालक
५७. नफा
५८. कपाटातील खण
५९. लाथ
६०. अरण्य
६२. मोठी नदी

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ५५ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.नाम घेता मुखी राघवाचे ८.चपखल १०.काल ११.राज १२.रातसार १५.मराठी १७.कलकलाट १९.कालगती २१.पावस २३.काव २४.परावलंबन २६.मलावरोध २७.फरक २८.टरफल २९.रीतभात ३१.कोरम ३३.थट्टा ३४.रेडकू ३५.आजवर ३७.पोक ३९.सजा ४०.सफल ४२.वाम ४३.सराफकट्टा ४५.कनक ४७.डहाळी ४८.दरबार ५०.डर ५२.माता ५४.बाकी ५५.सरतापालव ५६.अवयव ५८.करडा ५९.पहार ६१.रोज ६२.मनकवडा ६४.मालामाल ६६.नस ६८.कवाड ६९.नकटा ७०.कपबशी ७१.सासुरवाडी ७२.पान

उभे उत्तर : १.नाका २.मलमल ३.तारामती ४.मुजरा ५.राम ६.वारा ७.चेतक ८.चरक ९.खवाट १३.सालस १४.बेसावध १६.अवलंबणे १८.लालेलाल १९.कानिफनाथ २०.गडकरी २१.पाव २२.सब २३.कारोबार २४.परभारे २५.नटराज २६.मफलर ३०.तडकाफडकी ३१.कोरफड ३२.मघा ३५.आजा ३६.वतन ३८.कसर ३९.सट्टा ४१.लहानसहान ४२.वादळ ४२अ.मर ४४.कर ४६.कमालकिमान ४९.बारव ५१.कोरडा ५३.ताव ५४.बावनकशी ५५.सरडा ५६.अज ५७.यम ५८.कवडसा ६०.रसवान ६१.रोख ६३.कवा ६४.मारवा ६५.लकवा ६७.कोप

**खासदार नीलेश लंके यांसह शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांची भेट**

# शौर्य पाटील प्रकरणी कारवाईची मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




सेंट कोलंबाज स्कूल, गोल मार्केट, नवी दिल्ली येथील विद्यार्थी स्व. शौर्य प्रदीप पाटील यांच्या आत्महत्या प्रकरणात आरोपी शिक्षकांवर कोणतीही कारवाई न झाल्याने निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील खासदार नीलेश लंके, खासदार भास्कर भगरे गुरुजी आणि खासदार राजाभाऊ वाजे यांनी बुधवारी दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता यांची विशेष भेट घेतली.

१८ नोव्हेंबर २०२५ रोजी राजेंद्र नगर मेट्रो स्टेशन येथे शौर्य पाटील यांनी आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये त्यांनी शिक्षकांकडून झालेल्या कथित छळाचा उल्लेख करत प्राचार्या मिस अपराजिता पाल, कोऑर्डिनेटर मिस मनु कालरा, शिक्षिका मिस युक्ती महाजन आणि मिस जूली वर्गीस यांना जबाबदार धरले आहे. कुटुंबीयांनी पोलिसांत गुन्हा दाखल करूनही अद्याप आरोपींवर कारवाई न झाल्यामुळे खाजगी मिशनरी शाळांच्या प्रभावाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्व. शौर्य पाटील यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी यापूर्वीच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि दिल्लीचे शिक्षण मंत्री अशोक सूद यांना पत्राद्वारे चौकशी समिती स्थापन करण्याची मागणी केली होती. आजच्या बैठकीतही त्यांनी प्रकरणातील विलंबाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करून सहा प्रमुख मागण्यांवर लक्ष वेधले.

खासदारांकडून पुढे ठेवलेल्या मागण्यांमध्ये आरोपी शिक्षकांवर तातडीने कारवाई करणे, शाळा प्रशासनाने संबंधित शिक्षकांना निलंबित करणे, प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविणे, दिल्ली सरकारने वरिष्ठ वकील नेमणे, आरोपींवर कठोर कारवाई सुनिश्चित करणे आणि पीडित परिवाराला सुरक्षा पुरविणे यांचा समावेश होता.

शौर्यच्या आईने सहन केलेल्या वेदनेचा उल्लेख करत, “एका आईच्या नात्याने आपण तातडीने हस्तक्षेप करावा,” अशी विनंती खासदार लंके यांनी मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांना केली.

मुख्यमंत्री गुप्ता यांनी संपूर्ण प्रकरणाची गंभीर नोंद घेत योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन खासदारांना दिले.

## अरिहंत पतसंस्थेने सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा जपली : सुरपुरिया

**मिरजगावच्या अरिहंत पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन !**

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**



कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील अग्रगण्य असलेल्या अरिहंत ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, या संस्थेच्या सन.२०२६ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन अहिल्यानगर जिल्हा उपनिबंधक मंगेश बाबासाहेब सुरवसे साहेब यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संस्थापक चेअरमन पंकज इंद्रकुमार धोंगडे व युवा उद्योजक विशाल सुरपुरिया तसेच संचालक अमोल सकट आदी उपस्थित होते. युवा उद्योजक विशाल सुरपुरिया म्हणाले, अरिहंत पतसंस्थेने आर्थिक व्यवहारांसोबत अनेक सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा जपली आहे. या उपक्रमांपैकी संस्थेची वार्षिक दिनदर्शिका विशेष लोकप्रिय असून सभासदांसाठी ती अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे. सर्वसामान्य सभासद, ग्राहकांच्या आर्थिक समस्या सोडवण्यासाठी संस्था नेहमीच अग्रेसर राहिली असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. अरिहंत पतसंस्थेच्या वतीने सन २०२६ या नूतन वर्षाची दिनदर्शिका तब्बल ३ हजारांहून अधिक ग्राहक व सभासदांना वितरित करण्यात येणार आहे.

## अकोले तालुक्यातील ज्येष्ठ सहकार नेते बाळासाहेब भोर यांचा सत्कार!

**अकोले: (समर्थ गांवकरी)**





अकोले तालुक्यातील सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते, शिवसेनेचे (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांचे अतिशय विश्वासू समर्थक म्हणून ओळखले जाणारे माननीय बाळासाहेब भोर यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस आणि दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी बाळासाहेब भोर यांचा खारीक खोबऱ्याचा हार तसेच साईबाबांची मूर्ती देऊन सत्कार केला यावेळी उपस्थित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांनी प्रत्यक्ष भेटून बाळासाहेब भोर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. सहकार, शिक्षण, समाजकारण आणि ग्रामीण विकास क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करत, आगामी आयुष्य अधिक यशस्वी आणि उत्तम आरोग्यपूर्ण जावो, अशा शुभेच्छा मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आल्या.

## रब्बी हंगाम अनुदान मदतीपासून शेतकरी वंचित

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

जुलै ते सप्टेंबर २०२५ दरम्यान अतिवृष्टी व पुराने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून रब्बी हंगामाकरिता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरिता निधी देण्यात येत आहे. पण अनेक ठिकाणी या लाभापासून अनेक शेतकरी वंचित राहिले आहेत याकडे वरिष्ठांचे कमालीचे दुर्लक्ष झाले आहे. राज्य सरकारकडून प्रति हेक्टरी दहा हजार प्रमाणे निधी वितरण करण्यात येत आहे. जून ते सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे शेतातिल पिके, शेतजमीन खरडून विहिरीचे नुकसान, मनुष्य व पशुहानी, घर पडझड, घरातील वस्तू साहित्य नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले होते.

## किनवट – श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्रात दत्त जयंती अखंड नामजप सप्ताहाची उत्साहात सांगता

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट, श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र, एस. व्ही. एम. परिसर किनवट यांच्या वतीने आयोजित दत्त जयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचा समारोप गुरुवारी दि ५ डिसेंबर रोजी अतिशय भक्तिभावाने आणि आनंदी वातावरणात झाला. परमपूज्य गुरुमाऊली यांच्या कृपाशिर्वादाने २८ नोव्हेंबर रोजी सप्ताहाची सुरुवात झाली होती.

संपूर्ण सात दिवस विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. सप्ताह दरम्यान मंडळ स्थापना, गणेश याग, स्वामी याग, चंडी याग, गीता याग, रुद्र याग, नित्य स्वाहाकार आणि पूर्णाहूती अशा विधीपूर्वक धार्मिक अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले. सप्ताहातील प्रत्येक दिवस भक्तिभाव, शिस्तबद्ध वातावरण आणि आध्यात्मिक ऊर्जा यांनी युक्त होता.

गुरुचरित्र पारायणासाठी केंद्रातील तब्बल ७५ सेवेकरांनी सेवा रुजू करून भाविकांना मार्गदर्शन केले. सप्ताहात दररोज श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र दिंडोरी प्रणित मार्गाची सविस्तर माहिती देण्यात आली. ग्रामविकास, सामाजिक उपक्रम, माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेली मूल्यप्रणाली, तसेच अध्यात्म–समाजकार्य यांचे संतुलित महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

दिंडोरी प्रणित मार्गाची वैशिष्ट्ये – ८०% सामाजिक कार्य व २०% अध्यात्म असल्याने या मार्गातून माणसाचा सर्वांगीण विकास साध्य होतो, यावर प्रवचनांमधून भर देण्यात आला.

सप्ताहाच्या सांगतेनिमित्त आयोजित महाप्रसादाचे भक्तांना वाटप करण्यात आले. भाविक, सेवेकर, महिलाभक्त, तरुण मंडळी यांच्या सहकार्याने दत्त जयंती सप्ताह अत्यंत श्रध्दाभावाने पूर्ण झाला. दिवसभर केंद्र परिसरात भक्तिमय वातावरण, नामस्मरण, वेदमंत्रांचा निनाद आणि सत्संगामुळे अध्यात्माची अनुभूती सर्वांना मिळाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी केंद्रातील सर्व सेवेकर, अधिकारी, संतसेवक तसेच भक्तगणांनी परिश्रम घेतले. सात दिवस चाललेल्या या आध्यात्मिक महोत्सवाची सांगता भक्तिमय वातावरणात समाधानाने झाली.

## सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

**खर्डी : (समर्थ गांवकरी)**




सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर जि. ठाणे येथे दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठिक १०:०० वा. ते दुपारी ३: ०० वाजेपर्यंत महाविद्यालतील अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, एन. सी. सी., एन. एस. एस., सांस्कृतिक विभाग, स्पोर्टस् विभाग, महिला विकास कक्ष, एच. डी. एफ. सी. बँक (परिवर्तन) आणि सर जे. जे. महानगर रक्तपेढी (शासकीय रक्तपेढी), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन ज्ञानवर्धिनी संस्थेच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष बाळा पाटील, उपाध्यक्ष चंद्रशेखर अधिकारी, सचिव दिलीप भोपतराव यांच्या हस्ते झाले. सदरप्रसंगी संस्थेच्या कार्यकारी समितीचे सदस्य बाळासाहेब खारीक, अरुण कासार, दिपक बजाज, अनिल निचिते, वैभव जगे, संदिप महाजन, सदस्या श्रीमती आपर्णाताई खाडे, विश्वस्त समिती सदस्य मोरेश्वर भागवत, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. ए. के. सिंह, एच. डी. एफ. सी. बँकेचे (परिवर्तन) डेप्युटी व्हाईस प्रसीडेंट मंदार चव्हाटे, सीनिअर मॅनेजर हर्षद बर्वे, तसेच सर जे. जे. महानगर रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी अजय भिसे,डॉ. सचिन चौधरी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी अजय भिसे यांनी रक्तदानाचे महत्त्व सांगून, विद्यार्थ्यांना समाजोपयोगी उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच सदर रक्तदान शिबिरामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, मानवतेची आणि सेवाभावाची भावना अधिक दृढ होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या शिबिरात एकूण २७ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले व त्यातुन एकूण २७ बॅग रक्त जमा करुन ते सर जे. जे. महानगर रकतपेढी, मुंबई यांना देण्यात आले.

सदर रक्तदानादरम्यान एच. डी. एफ. सी. बँकेतर्फे सर्व रक्तदात्यांना एक गिफ्ट, प्रमाणपत्र, चहा, बिस्कीट व अल्पोपहार देण्यात आला.

या शिबिराला महाविद्यालयाचे आजी व माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व स्थानिक नागरीक यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिलाना. महानगर रक्तपेढी, मुंबई यांच्या विशेष सहकार्यामुळे यशस्वीरीत्या पार पडले.

## बिबट्याचा धुमाकूळ

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यात रोडगी शिवारात बिबट्याने वासराच्या फडशा पाडल्यामुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दि ९ मंगळवारी रोजी रात्री शिवाजी नारायण कदम यांच्या आखाड्यावरील वासराच्या फडशा पाडल्यामुळे शेतकरी वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. अर्धापूर तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ सुरू असुन वनविभाग झोपेचे सोंग घेवून चर्चा अयकत आहे. मागील पंधरा दिवसा खाली बामणी शिवारात बिबट्याने वासराच्या फडशा पडल्या होत्या चाभरा,चोरंबा,बामणी,दाभड,देळूब,पार्डी यास अनेक गावात बिबट्या दिसल्याची चर्चा जोमात सुरू असून बिबट्यामुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेती पिकाला पाणी देण्यासाठी रात्रीला लाईट येत असल्याने भीतीपोटी शेतकरी भिजवण्याचे सोडून देत आहेत.

## ॲड. ए. यू. पठाण यांच्या सत्कारास उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**




श्रीगोंदे तालुक्यातील श्री शिवाजीराव नागवडे विधी महाविदयालय तसेच श्रीगोंदा वकील श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या अध्यक्षपदी ॲड ए यु पठाण यांची निवड झाल्याबद्दल भव्य सत्कार समारंभ तसेच नवोदित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रम अनुराधा नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले .

प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ अंजुला चौबे यांनी महाविद्याल्याबद्दल माहिती देत असताना विद्यार्थी संख्या चांगली असुन सर्व विद्याथ्यार्थी ज्ञान घेत विविध उपक्रमामध्ये उत्स्फुर्त सहभागी होतात .

याप्रसंगी बोलताना पठाण म्हणाले . शेतकरी कुटूंबातून फार प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले माणूस कष्टाने मोठा होतो जिद्दीने शिकले पाहिजे नेहमी आशावादी असावे कायदा सरळ सोप्या भाषेत सांगता येईल त्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले पाहिजे . शिक्षकाने विद्यार्थ्यांना एखादी संकापना समजत नसेल तर ती पुन्हा पुन्हा शिकवली ल पाहिजे या मताचा मी आहे . ही उदयाच्या काळाची गरज आहे चारित्य संपन्न लोक न्याय संस्थेत यायला पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले .

श्रीगोदया सारख्या सधन तालुक्यात दोन विधी महाविदयालय आहेत हे फार गौरवशाली गोष्ट असाऱ्याचे त्यांनी नमूद केले . विद्यार्थ्यांना फार चांगले मार्गदर्शन मिळाले . त्याबद्दल विद्यार्थ्यां मध्ये चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते . सरांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभावे अशी भावना व्यक्त केली. यावेळी ॲड प्रसाद इंगळे अध्यक्ष श्रीगोंदा वकील संघ ॲड अशोक रोडे, ॲड अशोक वाळुंज ,ॲड जयंत शिंदे . ॲड नानासाहेब गायकवाड ,ॲड बापूसाहेब भोस, ॲड दत्तात्रय जऱ्हाड ॲड संदीप कावरे , दिग्विजय राजेंद्र नागवडे , डॉ अंजुला चौबे प्राचार्य श्री शिवाजीराव नागवडे विधी महाविदयालय ,अमोल नागवडे , सुर्यभान गोलांडे ,प्रा ॲड .साक्षी प्रथमशेट्टी, ॲड पुरुषोत्तम फाटे आदीसह बहुसंख्य वकील व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## वीरगावात शेतकऱ्यांची दुहेरी कोंडी

*‘सहाच्या आत घरात’ आवाहन*

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

■ **विजेचे वेळापत्रक रात्री १० ते ६!**

आढळा विभागातील वीरगाव (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) परिसरात विद्युत वितरण विभागाकडून शेतीपंपांना रोटेशन पद्धतीने वीजपुरवठा केला जात असून सध्या रात्री १० ते सकाळी ६ अशी वेळ शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. कांदा, गहू, हरभरा आणि भाजीपाला पिकांना पाणी देण्याचा हंगाम सुरू असल्याने रात्रीच्या वेळी पाणी देणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत त्रासदायक ठरत आहे. दुसरीकडे बिबट्यांचा वाढता वावर हा मोठा धोका बनला आहे. जंगलातील अन्न-पाण्याची टंचाई, उंच उस-मका पिकांमध्ये तयार झालेले आश्रयस्थान आणि वाढती संख्या यामुळे बिबटे लोकवस्तीत येऊ लागले आहेत. अनेक सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्यांचे दर्शन झाले असून प्रवासी वाहनांच्या जवळ येतानाचेही प्रकार समोर आले आहेत. लहान बछड्यांसह असलेली मादी बिबट्या विशेषतः आक्रमक असल्याने शेतकरी रात्री शेतात जाण्यास प्रचंड घाबरू लागले आहेत. परिस्थितीचा विचार करून वनविभागाने ‘सायंकाळी सहाच्या आत घरात’ राहण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे; पण विरुद्ध बाजूला विजेचे वेळापत्रक शेतकऱ्यांना ‘रात्री दहाच्या नंतर शेतात’ जाण्यास भाग पाडत आहे. त्यामुळे जीव धोक्यात घालून पाणी द्यावे की पिके आटू द्यावी, अशा कठीण प्रश्नात शेतकरी अडकले आहेत. या दुहेरी कोंडीतून मुक्तता मिळावी, यासाठी शेतकऱ्यांची मागणी स्पष्ट आहे, “बिबट्यांचा बंदोबस्त करा किंवा दिवसा शेतीपंपांना वीज द्या!”

## स्वारातीम विद्यापीठात “आविष्कार २०२५-२६” चे भव्य आयोजन

■ **विद्यापीठ परिक्षेत्रातील चार जिल्ह्यांतील १६८ स्पर्धकांचा सहभाग**

■ **४८ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड**

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे “आविष्कार २०२५-२६” या विद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धेचे भव्य आयोजन दि. ९ डिसेंबर, २०२५ रोजी गणितीयशास्त्रे संकुलातर्फे करण्यात आले. विद्यापीठ परिक्षेत्रातील नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर या चारही जिल्ह्यांतील विविध सहा विद्याशाखांमधून एकूण १६८ स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. (ट्रिपल पी) स्कॉलर अशा तीन स्तरांवर स्वतंत्र गट तयार करण्यात आले होते. पदवी व पदव्युत्तर गटांत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे विजेते घोषित करण्यात आले, तर पीएच.डी. (ट्रिपल पी) स्कॉलर गटात प्रथम व द्वितीय क्रमांक निवडण्यात आला. सर्व फेऱ्यांतील एकत्रित गुणवत्तेनुसार एकूण ४८ स्पर्धकांची राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. मेघना कवळी (आय.ए.एस.), मेधव प्री-स्ट्रेस्ड पाईप प्रा.लि.चे संचालक अभिजित चंद्रकांत; तसेच नांदेडच्या एम.आय. डी.सी.चे प्रादेशिक अधिकारी राजाराम के. गुंथळे आणि नांदेडचे शैक्षणिक अधिकारी माधव सलगर उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन व कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

स्पर्धेचे संयोजन डॉ. एस. जे. वाढेर यांनी तर समन्वयक म्हणून डॉ. के. ए. बोगले व डॉ. रुपाली एस. जैन यांनी संपूर्ण स्पर्धेचे नियोजन आणि व्यवस्थापन प्रभावीपणे सांभाळले.

एम.आय.डी.सी.चे प्रादेशिक अधिकारी राजाराम गुंथळे यांनी विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे कौतुक करत “उद्योजकतेसाठी आवश्यक ते मार्गदर्शन व सहाय्य एम.आय. डी.सी. मार्फत उपलब्ध करून दिले जाईल,” असे आश्वस्त केले.

जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आय.ए.एस. सौ. मेघना कवळी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देताना, “विद्यार्थ्यांची मेहनत, जिद्द आणि संशोधनातील नाविन्यपूर्ण दृष्टिकोन प्रशंसनीय असून हे प्रकल्प समाजोपयोगी ठरण्याची क्षमता बाळगतात,” असे सांगून अभिनंदन केले.

कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, “आविष्कार ही स्पर्धा संशोधन संस्कृती अधिक बळकट करणारे व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि प्रयोगशीलता हीच विद्यापीठाची खरी ताकद आहे.”

दिवसभर चाललेल्या पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल डेमोन्स्ट्रेशन, नाविन्यपूर्ण संशोधन संकल्पना आणि वैज्ञानिक चर्चांमुळे आविष्कार स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विजेत्यांचा सत्कार करून त्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. जे. वाढेर यांनी केले, आभार प्रदर्शन डॉ. रुपाली जैन यांनी तर सूत्रसंचालन डॉ. नीना गोगटे यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणितीयशास्त्र संकुलातील सर्व प्राध्यापक, संशोधक व कर्मचार्यांनी तसेच विद्यापीठातील विविध संकुलातील संचालक आणि प्राध्यापकांनी मोलाचे सहकार्य केले.

## कोटक सिक्युरिटीजचा बाजाराबाबत दृष्टिकोन

# जागतिक अस्थिरतेतही समभाग बळकट, सोन्याची चमक कायम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

कोटक सिक्युरिटीज लिमिटेड ("कोटक निओ") ने २०२६ मधील शेअरबाजाराच्या वाटचालीबाबतचा 'मार्केट आउटलुक २०२६' हा अहवाल आज प्रसिध्द केला. जागतिक पातळीवर अनिश्चितता राहणार असली तरी भारतीय शेअरबाजार आणि आणि कमोडिटी क्षेत्र चांगली कामगिरी करण्याचा आशावाद या अहवालात व्यक्त करण्यात आलेला आहे. आगामी वर्षात गुंतवणूकदारांनी बारकाईने लक्ष ठेवावेत असे ढोबळ आर्थिक पातळीवरील प्रमुख प्रवाह (मॅक्रो ट्रेंड), क्षेत्रनिहाय निर्माण होऊ शकणाऱ्या संधी आणि कमोडिटी क्षेत्रातील प्रवाह याबाबत या अहवालात प्रकाशझोत टाकण्यात आलेला आहे.

अहवालाच्या अनावरणप्रसंगी बोलताना कोटक सिक्युरिटीजचे एमडी आणि सीईओ श्रीपाल शाह म्हणाले, "जागतिक अस्थिरतेतही भारत विकासाचा लखलखणारा दिवा राहणार आहे. कंपन्यांचे उत्पन्न भरभक्कम राहण्याचा अंदाज आणि सरकारच्या धोरणात्मक पाठबळ या दोन घटकांमुळे समभागांबाबत आमचा दृष्टिकोन अतिशय सकारात्मक आणि उत्साहवर्धक आहे. २०२६ मध्ये सोने गुंतवणूकीसाठी सुरक्षित मालमत्ता म्हणून आपली चमक कायम राखण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर तरुण गुंतवणूकदारांच्या वाढत्या सहभागामुळे शेअरबाजार अधिकाधिक विस्तारेल आणि संपत्ती निर्मितीसाठी तो सज्ज आहे."

गुंतवणूक उद्योगाच्या बाबतीत भाष्य करताना ते पुढे म्हणाले, "सेबीने नुकतेच केलेल्या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांनुसार ६३ टक्के कुटुंबांना शेअरबाजारातील किमान एका तरी गुंतवणूक योजनेबाबत माहिती आहे. परंतु केवळ ९.५ टक्के कुटुंबे शेअरबाजारात गुंतवणूकीबाबत सक्रिय आहेत. यातून भारताच्या शेअर बाजारात वाढीची प्रचंड क्षमता दडली असल्याचे स्पष्ट होते. गुंतवणूक अधिकाधिक सर्वसमावेशक आणि सुलभ करण्यासाठी ब्रोकरेज कंपन्यांनी पुढाकार घेणे अतिशय आवश्यक आहे."

कोटक सिक्युरिटीज मार्केट आउटलुक २०२६ अहवालात पुढील वर्षासाठी नमूद करण्यात आलेले प्रमुख प्रवाह आणि त्यांच्या परिणामांची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

शेअर बाजार: आगामी वाटचालीसाठी आशावादी टप्पा


- सप्टेंबर २०२४ मध्ये भारतीय शेअरबाजाराने उच्चांकी पातळी गाठली. तेथून बाजारांमध्ये १७ टक्के घसरण झाली, परंतु २०२५ च्या अखेरीस निफ्टी फिफ्टीने पुन्हा एकदा नवीन सर्वकालिन उच्चांकाला स्पर्श केला.
- लार्ज-कॅप्स समभागांमध्ये वाढ झाली तर मिड-कॅप्स आणि स्मॉल-कॅप्समध्ये घसरण झाली.
- ऑटोमोबाईल बँका आणि धातू क्षेत्रातील समभागांनी चमकदार कामगिरी केली तर आयटी आणि एफएमसीजी क्षेत्र अतिशय कमकुवत राहिले.
- विदेशी गुंतवणूकदार संस्थांनी सातत्याने भारतीय बाजारातून पैसा काढून घेतला, परंतु स्थानिक गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करत बाजाराला वेळोवेळी सावरल्याने भारतीय शेअरबाजारावरील विश्वास आणखी बळकट झाला.
- प्राथमिक बाजारात मजबूत उलाढालीतून गुंतवणूकदारांचा आशावाद आणि लवचिकता अधोरेखित झाली.

कंपन्यांच्या कमाईबाबतची धारणा आणखी बळकट झाली आहे. निफ्टीचा नफा आर्थिक वर्ष २७ मध्ये १७.६ टक्के आणि आर्थिक वर्ष २८ मध्ये १४.८ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे.

# भारताची डिजिटल फ्रेंडशिप्स क्रांती

**बेंगळुरू : (समर्थ गांवकरी)**

इंटरॅक्ट ग्रुपचा प्रमुख उत्पादन आणि भारताचा पहिला अवतार-आधारित ऑडिओ सोशल डिस्कव्हरी प्लॅटफॉर्म FRND यांनी आज 'इयर इन कन्व्हर्सेशन्स 2025' हा अभ्यास जाहीर केला, ज्यात भारताच्या डिजिटल वर्तनाचे चित्रण करण्यात आले आहे. आश्चर्यकारक असे की, एकूण सहभागातील तब्बल 92% सहभाग टियर-1 शहरांच्या बाहेरून येत आहे. हा अभ्यास एका स्पष्ट सांस्कृतिक बदलाकडे निर्देश करतो भारताच्या टियर-2 आणि टियर-3 शहरांमध्ये देशातील सर्वात अर्थपूर्ण आणि भावनिक डिजिटल फ्रेंडशिप्स घडत आहेत.




दक्षिणेतील एर्नाकुलम (केरळ) पासून उत्तरेतील अनंतनाग (जम्मू आणि काश्मीर) आणि पश्चिमेतील जामनगर (गुजरात) पर्यंत, वापरकर्त्यांनी व्हॉईस-आधारित साथसंगत, विकेंडला होणाऱ्या व्हिडिओ संभाषणांमध्ये आणि प्रादेशिक अभिव्यक्तींनी भरलेल्या संवादांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला, ज्यामुळे भारताच्या नव्या डिजिटल वर्तन पद्धती आकाराला आल्या. हैदराबाद, बेंगळुरू आणि चेन्नई यांनी सर्वाधिक सक्रिय वापरकर्त्यांसह भारताच्या 'कन्व्हर्सेशन मॅप' मध्ये आघाडी घेतली, तर आंध्र प्रदेशातील वापरकर्त्यांनी सर्वात जास्त काळ संवाद साधला. 2025 च्या डेटातून भारताची बदलती डिजिटल ओळख स्पष्टपणे दिसून येते जी व्हॉईस-फर्स्ट, भावनिक आणि प्रादेशिक अभिव्यक्तींवर आधारित आहे. 95% नवीन वापरकर्ते नॉन-मेट्रो भागातून आणि हजारो वापरकर्ते अमेरिका, यूके, मलेशिया आणि ऑस्ट्रेलियातून जोडत असल्यामुळे, FRND हा खऱ्या साथसंगतीसाठी जागतिक पण 'भारतमय' असा डिजिटल मंच बनत आहे. प्लॅटफॉर्मवरील सर्वात लांब कॉल 1247 मिनिटांचा म्हणजे जवळपास 20.3 तासांचा होता. वापरकर्ते आता क्यूरेटेड फीड्सच्या मागे धावत नाहीत; ते आवाजाच्या माध्यमातून भावनिक सुरक्षितता, सहानुभूती, समावेशन आणि समुदायाची भावना शोधत आहेत.

# सोलिसकडून सर्वात शक्तिशाली ट्रॅक्टर्सचे प्रदर्शन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सोलिस या इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेड (आयटीएल)च्या प्रमुख ब्रॅंडने महाराष्ट्रातील पुणे येथे किसान अॅग्री शो 2025 मध्ये सर्वात शक्तिशाली मल्टीस्पीड ट्रॅक्टर्सच्या नाविन्यपूर्ण व व्यापक श्रेणीला दाखवले आहे. यामध्ये नुकतेच लॉंच करण्यात आलेल्या सोलिस जेपी 975 ट्रॅक्टरचा समावेश आहे, जो पूर्णपणे नेक्स्ट जनरेशन प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आला आहे, तसेच सॉलिस 2716 एसएन आणि यानमार वायएम 235 अशा नेक्स्ट-जनरेशन मॉडेल्सचा समावेश आहे, जे शेतक-यांना अधिक आऊटपुट देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.




या नवीन मॉडेल्सना पूरक म्हणून कंपनीच्या श्रेणीमध्ये सोलिस 5724 4 डब्ल्यूडी आणि वायएम 348 आर देखील आहेत, जे विशेषत: प्रत्येक विकसित किसानला सर्वोत्तम आरामदायीपणा आणि उच्च ऑपरेशन कार्यक्षमता देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत. सोलिस जेपी 975 2डब्ल्यूडी/4डब्ल्यूडी पूर्णपणे नवीन प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आला आहे, ज्यामध्ये जेपी टेक 4-सिलिंडर इंजिन, भारतातील सेगमेंटमधील पहिले 15एफ + 15आर इपिसायकलिक ट्रान्समिशन, साइड-शिफ्ट गिअर्स आणि सर्वोत्तम कृषी अनुभवासाठी किमान 5 सानुकूल वर्किंग स्पीड्स आहेत. ऑर्चर्ड एक्स्पर्ट सोलिस 2716 एसएन मध्ये जगातील सर्वोत्तम इंजिन, सर्वोच्च पीटीओ पॉवर, साइड शिफ्ट गिअर, 3 फीट पर्याय, 12एफ+4आर ट्रान्समिशन आहे, तर फार्मिंग एक्स्पर्ट वायएम 235 मध्ये सानमारचे प्रगत शक्तिशाली इंजिन, प्रोजेक्टर हेड लॅम्प, प्रमाणित आरओपी, पॉवर शटलसह दर्जात्मक ग्राऊड क्लीअरन्सची खात्री देणारे 16 स्पीड पर्याय, किमान टर्निंग रेडियस, उत्तम नियंत्रण आणि सर्व कृषी क्रियाकलापांसाठी वैविध्यता आहे.

## लाईव्ह इव्हेंट्स पाहणाऱ्यांची संख्या वाढली

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

2025 हे वर्ष संपत असताना, भारतातील आघाडीचे मनोरंजन केंद्र असलेल्या बुकमायशो ने #बुकमायशोथ्रोबॅक2025 लॉंच केले आहे. हे अशा वर्षाचे सेलिब्रेशन आहे, जिथे मनोरंजन केवळ क्षणिक न राहता, एक चळवळ बनले. हे असे वर्ष होते, जिथे भारताने केवळ मनोरंजनाचा उपभोग घेतला नाही, तर त्याची निवड केली, स्वीकार केला आणि जाणीवपूर्वक ते जगले. विक्रम मोडणाऱ्या चित्रपटांपासून ते उत्साहवर्धक थेट कार्यक्रमांपर्यंत, 2025 ने हे सिद्ध केले की भारतीयांसाठी घराबाहेर पाऊल टाकणे हे सहज घेतलेला निर्णय नव्हता, तर ते आवश्यक होते.

# अलुकोबॉन्डने सादर केली 'अलुकोअर' ची नेक्स्ट–जेन श्रेणी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्वित्झर्लंड-स्थित असलेल्या ३ ए कंपोझिट्स या जागतिक स्तरावर नव कल्पनाधारित व उच्च दर्जाचे अल्युमिनियम कंपोझिट्स मटेरियल निर्मिती करणाऱ्या आघाडीच्या कंपनीने आपल्या 'अलुकोबॉन्ड' या नाममुद्रे अंतर्गत आपल्या तीन दशकांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या पुढील पिढीतील 'अलुकोअर' या कॉम्पोझिट मटेरियल्सचा भारतातील आर्किटेक्ट्ससाठी व आर्किटेक्चरच्या क्षेत्रात परिवर्तन आणण्याच्या दृष्टीने विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. आपल्या नव-संशोधनाच्या समृद्ध वारशावर आधारित 'अलुकोअर' हे उत्पादन अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिक प्रगत व सक्षम केले गेले असून आता ते 'अलुकोअर हनीकोम्ब पॅनेल्स' आणि



'अलुकोअर एसीसीपी या दोन श्रेणींत अभिनव स्वरूपात उपलब्ध आहे. 'अलुकोअर हनीकोम्ब' मध्ये दोन ॲल्युमिनियम शीट्सच्यामध्ये ॲल्युमिनियम हनीकोम्ब कोअर असतो, ज्यामुळे ते अत्यंत मजबूत आणि हलके बनते. तर 'अलुकोअर एसीसीपी.' मध्ये दोन ॲल्युमिनियम स्किन्सच्या मध्ये ॲल्युमिनियम कॉरुगेटेड कोअर असतो, जो त्याला अधिक कठोरता आणि लवचिकता प्रदान करतो. हे दोन्ही प्रकार भारतीय आर्किटेक्ट्सच्या बदलत्या गरजांनुसार विकसित करण्यात आले आहेत, ज्यामुळे ते उच्च व उत्कृष्ट डिझाईन, सौंदर्य आणि टिकाऊपणा यांचे परिपूर्ण संयोजन साधू शकतात.

हा विस्तार कंपनीच्या विद्यमान तंत्रज्ञानाधारित, नेक्स्ट-जेन क्लॅडिंग सोल्युशन्सच्या प्रमुख पोर्टफोलिओला अधिक बळकटी देईल, जिथे डिझाईन आणि कार्यक्षमतेची भूमिका महत्त्वाची असते. अलुकोअरचा वापर विशाखापट्टणम तसेच पटना विमानतळ, लखनौ येथील लुलु मॉल, नोएडा येथील मॅक्स टॉवर् इत्यादी भारतातील अनेक महत्त्वाच्या प्रतिष्ठीत पायाभूत व खाजगी प्रकल्पांमध्ये झाला आहे. अलुकोअरची उत्कृष्ट यांत्रिक वैशिष्ट्ये या उत्पादनाला फसाड क्लॅडिंग, रूफिंग आणि देखभालयोग्य अशा वॉकेबल रूफ्ससाठी सुयोग्य बनवतात.

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी 'मेक इन इंडिया' मोहिमेअंतर्गत, ३ ए कॉम्पोझिट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी महाराष्ट्रातील पुण्याजवळील रांजणगाव येथील अत्याधुनिक कारखान्यात अलुकोअरचे उत्पादन करीत आहे. सध्या अलुकोअरचे भारतात मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जात असून जागतिक स्तरावर याची निर्यातही केली जाते. या उत्पादनाच्या विविध उपयोगांबद्दल बोलताना ३ ए कॉम्पोझिट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष व सीईओ श्री. रणजित शर्मा म्हणाले, "आर्किटेक्चरच्या वेगाने बदलणाऱ्या क्षेत्रात आम्ही इनोव्हेटिव्ह कॉम्पोझिट मटेरियल्स सादर करत आहोत.

# "आपला मावळा" संघटनेच्या निबंध व किल्ले बनवा स्पर्धेचा निकाल जाहीर

■ 'आपला मावळा'ची क्रिएटिव्ह स्पर्धा रंगली

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

दिवाळीच्या मुहूर्तावर आपला मावळा सामाजिक संस्थेतर्फे आयोजित निबंध स्पर्धा आणि किल्ले बनवा स्पर्धा यांचे निकाल अखेर जाहीर झाले. "जर छत्रपती शिवाजी महाराज आजच्या काळात जन्माला आले तर..." या रोमहर्षक विषयावर निबंध लिहिताना चिमुकल्यांची कल्पनाशक्ती अधोरेखित झाली.

किल्ले बनवा स्पर्धेत तर लहानग्यांनी इतिहासाला नव्या रूपात जिवंत केले.

वाढत्या सहभागामुळे निकाल जाहीर करण्यात थोडा विलंब झाला असून संस्थेने त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे.

स्पर्धकांच्या मोठया प्रतिसादामुळे निबंध स्पर्धा दोन वयोगटात विभागण्यात आली.




निबंध स्पर्धा (वयोगट ०६ ते ११ वर्षे)
आयुष शरद केदारी (ढवळपुरी) प्रथम, अस्मी मणि पुजारे (सिंधुदुर्ग) द्वितीय, धनराज नवनाथ वाव्हळ (ढवळपुरी) तृतीय, स्नेहा शरद चितळकर (ढवळपुरी) चतुर्थ, गौरी गहिनीनाथ वाळके (अहिल्यानगर) पाचवा क्रमांक.

निबंध स्पर्धा (वयोगट १२ ते १५ वर्षे)
आकांक्षा शरद गांगर्डे (कर्जत) प्रथम, तन्मय पडोळे (अहिल्यानगर) द्वितीय, मनस्वी गुळवे (टाकळीढोकेश्वर) तृतीय, समर्थ पुंड (अहिल्यानगर) चतुर्थ, स्वप्राली शिंदे (पुरंदर, पुणे) पाचवा क्रमांक.

किल्ले बनवा स्पर्धा (लहान गट)
राज जाधव (कर्जत, रायगड) – रायगड किल्ला प्रथम, दुर्वांक अनिल काळे (कोल्हापूर) – मिरज भुईकोट द्वितीय, सोहम कदम (खोपोली) – सिंहगड तृतीय, मयुरी जाधव – विजयदुर्ग चतुर्थ, मनमाड गटातील स्पर्धकांचा संयुक्त पाचवा क्रमांक

किल्ले बनवा स्पर्धा (मोठा गट)
स्वप्रिल हांडे (मुंबई) – अजिंक्यतारा प्रथम, मयुरेश भोईर (मुंबई) – जिंजी द्वितीय, सानिका पेडणेकर (सिंधुदुर्ग) – विशाळगड तृतीय, हर्षदा पवार (पुणे) – मल्हारगड चतुर्थ, भाविक म्हसे – राजगड पाचवा क्रमांक.


उत्तेजनार्थ पारितोषिके
साहिल खैरे – विजयदुर्ग, अरुण निवास मित्र मंडळ – सुवर्णदुर्ग, राहुल मगर – पन्हाळा संस्कार बाबर – पट्टुर्ग, विशेष आकर्षण म्हणजे उमेद परिवार (हडपसर) यांनी तयार केलेला सुवर्णदुर्ग या प्रतिकृतीस विशेष पारितोषिक जाहीर करण्यात आले.

**लवकरच बक्षीस वितरण**

सर्व विजेते आणि सहभागी स्पर्धकांसाठी भव्य बक्षीस वितरण सोहळा आयोजित केला जाणार आहे. उपस्थित राहू न शकणाऱ्या स्पर्धकांना प्रमाणपत्र टपालाद्वारे पाठवले जाईल. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असून मुलांच्या सहभागाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याबद्दल आयोजकांनी समाधान व्यक्त केले.

## बुमराहने स्ट्रीक्स सुपरफास्टला दिला पाठिंबा

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**




स्ट्रीक्स या हायजेनिक रिसर्च इन्स्टिट्यूट (एचआरआय) च्या भारतातील आघाडीच्या हेअर कलर व केअर ब्रॅंडने आपले वैविध्यपूर्ण इनोव्हेशन स्ट्रीक्स शॅम्पू हेअर कलरसाठी प्रॉडक्ट ॲम्बेसेडर म्हणून भारतीय क्रिकेट संघामधील प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या नियुक्तीची घोषणा केली आहे. उत्साहवर्धक नवीन मोहिम मेन फास्ट, स्ट्रीक्स सुपर-फास्टच्या माध्यमातून या सहयोगाला सादर करण्यात आले आहे. ही मोहिम आत्मविश्वास, गती आणि आकर्षक स्टाइलला साजरे करते. गती, दर्जात्मक कामगिरी आणि सातत्यतेसाठी ओळखला जाणारा जसप्रीत बुमराह स्ट्रीक्स शॅम्पू हेअर कलरची मुलभूत कटिबद्धता: गती व दर्जात्मक कार्यक्षमतेला सादर करतो.

### दांगट व पटोले यांच्या राजेशाही विवाहानंतर, सत्यनारायण पूजा सोहळ्यात

# कार्तिकी गायकवाड यांच्या सुरेल गाण्यांनी रंगत!



**पिंपळवंडी : (समर्थ गांवकरी)**

पिंपळवंडी येथील दांगट मळा परिसरात दांगट व पटोले कुटुंबांच्या राजेशाही विवाह सोहळ्याची चर्चा अजूनही सुरू असताना, चि. वरूण बबन दांगट आणि चि. सौ. का. प्रिया नानाभाऊ पटोले यांचा विवाहसोहळा नुकताच नागपूर येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला. या मंगल सोहळ्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या सत्यनारायण महापूजेच्या कार्यक्रमाला गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या धार्मिक कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी सुप्रसिद्ध गायिका कार्तिकी गायकवाड यांची विशेष सुरेल गाणी आयोजित करण्यात आली होती. त्यांच्या सुमधुर आवाजाने उपस्थितांची मनोवेधक रसिकता जागृत केली. भक्तीगीत, आल्हाददायक स्वर आणि त्यांच्या खास गायकीमुळे संपूर्ण कार्यक्रम रंगतदार आणि अविस्मरणीय ठरला. सत्यनारायण पूजेचा हा मंगल कार्यक्रम आणि त्यानिमित्त झालेला संगीत मैफलीचा सोहळा पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. दांगट व पटोले कुटुंबांनी पाहुण्यांचे मनापासून स्वागत करून कार्यक्रमाची उत्तम व्यवस्था केली. एकूणच, पिंपळवंडी येथे पार पडलेला हा भक्तिमय आणि सांस्कृतिक सोहळा स्थानिकांच्या मनात कायमस्वरूपी ठसा उमटवणारा ठरला.

# दहशत पसरवणाऱ्याला मुंब्रा पोलिसांनी घडवली अद्दल

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

सोशल मीडियावर दहशत पसरवणाऱ्याला मुंब्रा पोलिसांनी चांगलीच अद्दल घडवली आहे. सोशल मीडियाचा गैरवापर करणाऱ्यांचे आजकाल प्रमाण वाढू लागले आहे. असाच एक प्रकार मुंब्रा येथील ६-१२ कंपनी नावाने गावगुंडकरी करत धमकी सारखा केला आहे परंतु पोलिसांचे फटके बसताच माफीनाम्याचा व्हिडीओ त्याने प्रसारित केला. समाजमाध्यमाचा वापर तो त्या व्यक्तीच्या वापरावर असतो. कोणी या सोशल मिडीयाचा वापर करुन व्यवसायात यश मिळवितो तर कोणी प्रसिद्धी परंतु सोशल मिडीयावर रील्स तयार करून सोशल मिडीयाचे 'भाई' बनण्याचे प्रकारही आता वाढत आहे. मुंब्रा येथे अशाच प्रकारे एक ६-१२ कंपनी नावाने एकत्र येऊन एक रील्स



तयार केली. परंतु या रील्समध्ये धमकी देण्याचा प्रकार त्यांनी केला. ही व्हिडीओ समाजमाध्यमाद्वारे पोलिसांना मिळताच धमकी देणाऱ्याला अवघ्या काही तासांत पोलिसांनी ताब्यात घेतले. इन्स्टाग्रामचा वापर करून रीलद्वारे धमकी देत असल्याचे दिसून आले. सदर व्हिडीओ मुंब्रा पोलिसांच्या हाती लागताच पोलीस पथकाने त्याचा शोध घेतला त्यानंतर त्याने गुडघ्यावर बसून माफी मागितली.

# आपल्या त्वचेची काळजी घ्या कॅलिफोर्निया बदामांसह

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

हिवाळा आल्यानं आपल्याला आनंदाचे आणि उबदार रात्रींचे अनुभव मिळतात, पण त्यासोबतच अनेकांसाठी एक परिचित आव्हानही येते: कोरडी, नीरस आणि संवेदनशील त्वचा. थंड हवेने आपल्या त्वचेतील ओलावा काढून टाकतो, ज्यामुळे त्वचा खुरखुरीत आणि जळजळणारी होऊ शकते. टॉपिकल स्किनकेअर काही मदत करू शकते, पण टिकाऊ पोषण अंतःस्रोतापासून सुरू होते. आहारतज्ज्ञ ऋतिका सामद्दार सांगतात की हिवाळ्यातील त्वचेची काळजी घेण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे शरीराला योग्य अन्न देणे.



**ऋतिका सामद्दार, प्रादेशिक प्रमुख, डायटेटिक्स, मॅक्स हेल्थकेअर, दिल्ली**

ती स्पष्ट करते की हिवाळ्यातील कोरडेपणा हा फक्त त्वचेची काळजी घेण्याचा प्रश्न नाही, तर तो पोषणाशीही संबंधित आहे. ती प्रथिने, निरोगी फॅट्स, व्हिटॅमिन E आणि ओमेगा-3 यांनी समृद्ध अन्नाचे महत्त्व अधोरेखित करते, जसे की फॅटी फिश आणि कॅलिफोर्निया बदाम. दररोजच्या आहारात बदामांचा समावेश केल्यास त्वचेला आतून पोषण मिळते, ज्यामुळे ती कोमल, हायड्रेटेड आणि निरोगी राहते, अगदी कठीण हवामानातही.

बदाम हे आवश्यक पोषक तत्त्वांनी समृद्ध आहेत जे त्वचेच्या आरोग्यास अनेक मार्गांनी आधार देतात. हे व्हिटॅमिन E चे एक समृद्ध नैसर्गिक स्रोत आहेत, जे एक महत्त्वपूर्ण अँटिऑक्सिडंट आहे आणि त्वचेला हानीपासून संरक्षण देते. व्हिटॅमिन E त्वचेची नैसर्गिक आडथळा क्षमता मजबूत करते, ज्यामुळे त्वचा ओलसर राहते आणि कठीण हिवाळ्यातही मऊ राहते. याशिवाय, व्हिटॅमिन E मध्ये अँटी-एजिंग गुणधर्मही आहेत जे त्वचेला लवचिकता टिकवण्यास मदत करतात. कॅलिफोर्निया बदाम हिवाळ्यासाठी आवश्यक असण्याचं आणखी एक कारण म्हणजे त्यातील निरोगी मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्सची जास्त मात्रा. हे निरोगी फॅट्स अंतर्गत ओलावा देणारे म्हणून काम करतात, त्वचेची लवचिकता वाढवतात आणि अति कोरडेपणा टाळतात. यामुळे त्वचा फुललेली आणि मऊ दिसते, तसेच थंड हवामानात दिसणाऱ्या सूक्ष्म रेषा कमी होतात.

बदाममध्ये प्रथिने, रिबोफ्लेविन आणि झिंक देखील भरपूर प्रमाणात असतात, जे त्वचेच्या एकूण आरोग्यासाठी योगदान देतात. हे सर्व पोषक घटक एकत्रितपणे चमक पुनर्संचयित करण्यास, निस्तेजपणा कमी करण्यास आणि त्वचेच्या मजबूत अडथळ्याला आधार देण्यास मदत करतात. संशोधनात असेही सूचित केले आहे की बदाम नियमितपणे खाल्ल्याने चेहऱ्याच्या त्वचेचा रंग सुधारण्यास आणि सुरकुत्या कमी होण्यास मदत होते. रितिका आतड्यांचे आरोग्य आणि त्वचेचे आरोग्य यांच्यातील दुवा देखील दर्शवते. अभ्यासातून असे दिसून आले आहे की बदाम आतड्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात, ज्यामुळे जळजळ आणि ब्रेकआउट्स कमी होऊ शकतात. हिवाळ्यात, जेव्हा पचन समस्या अधिक सामान्य असतात, तेव्हा हे विशेषतः उपयुक्त ठरते. ती दररोजच्या जेवणात कॅलिफोर्निया बदाम घालण्याची आणि पोषक तत्वांचे शोषण वाढवण्यासाठी सकाळी ते खाण्याची शिफारस करते.

या हिवाळ्यात चमकदार त्वचेसाठी महागडे उपचार किंवा क्लिष्ट रूटीन आवश्यक नाहीत. कधी कधी सर्वात प्रभावी सौंदर्य उपाय साध्या, रोजच्या आहारातच असतात. त्यांच्या उत्कृष्ट पोषक तत्वांच्या गुणधर्मांमुळे, कॅलिफोर्निया बदाम आपल्या त्वचेची नैसर्गिक, प्रभावी आणि स्वादिष्ट पद्धतीने काळजी घेण्याचा मार्ग देतात.